# भारतीय अर्थव्यवस्था विकास : आव्हाने व उपाय

**डॉ. अरुण सदाशिव घायाळ**
सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग, स्व. भास्करराव शिंगणे कला,
प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे महाविद्यालय, साखरखेर्डा

---

जागतिक पातळीवर अर्थव्यवस्था विकास हा महत्वाचा मुद्दा आहे. प्रत्येक राष्ट्र जागतिक अर्थव्यवस्थेत आपल्या राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतात. यासाठी अर्थव्यवस्था विकसित होणे आवश्यक असते. भारताच्या बाबतीत विचार करता भारत हे एक विकसनशील राष्ट्र असून विकासाच्या दिशेने मार्गक्रमण करीत आहे.

भारताच्या अर्थव्यवस्थेचे एक महत्वाची वैशिष्ट्येपूर्ण अशा प्रकारची आपली अर्थव्यवस्था आहे. यामध्ये शेती, उद्योगधंदे, हस्तव्यवसाय, कारखानदारी आणि विविध प्रकारच्या छोट्या मोठ्या सेवा यांचा समावेश होतो. प्रत्येकाच्या माध्यमातून भारताच्या अर्थव्यवस्थेला एक प्रकारे हातभार लावला जात आहे. परंतु असे असले तरी भारताची अर्थव्यवस्था समोर अनेक आव्हाने आहेत. भारतीय अर्थव्यवस्था हि जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. भारताच्या वार्षिक उत्पन्नाचा विचार करता २०२२ नुसार ८५४.७ अब्ज डॉलर एवढे भारताचे उत्पन्न आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेचा झपाट्याने विकास होत असून जगामध्ये सर्वात वेगाने विकसित होत असलेल्या अर्थव्यवस्था पैकी भारतीय अर्थव्यवस्था आहे.परंतु असे असले तरी भारताची अर्थव्यवस्था समोर अनेक आव्हाने आहेत

भारताने १९९१ पासून नव्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केला आहे. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या त्रिसूत्रीवर आधारित असे अनुषंगिक बदल आर्थिक धोरणामध्ये केले गेले, त्याचा अनुकूल व प्रतिकूल परिणाम कृषी, उद्योग व सेवा क्षेत्रावर झाला. भारतीय अर्थव्यवस्थेच्या संरचनात्मक चौकटीमध्ये उपलब्ध मनुष्यबळाला पुरेशा भौतिक व सामाजिक सुविधा प्राप्त करून देण्यात अडथळे निर्माण होऊ लागले. आर्थिक उदारीकरणाच्या काळात अर्थव्यवस्था विकासाचा वेग ३.५ % वरून ९ % एवढा वाढला. कृषी अर्थव्यवस्था सेवाप्रधान अर्थव्यवस्था बनू लागली. माहिती तंत्रज्ञानाचा विकास हा एक महत्वाचा घटक देशाच्या विकासाची गती वाढविण्यास प्रेरक ठरू शकतो. तथापि खेड्यातील लोक आजही विकासापासून वंचित आहेत. अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर हे कृषी उत्पादनात महत्वाचे घटक असूनही आर्थिक विकापासून दुर्लक्षित आहेत.

## भारतीय अर्थव्यवस्था विकासातील आव्हाने

१) वाढती लोकसंख्या

वाढती लोकसंख्या यामुळे देशात अन्नधान्य टंचाई, बेरोजगारी वाढते. त्यामुळे देशाचा आर्थिक विकास खुंटते. आजमितीस भारताची लोकसंख्या अंदाजे १३५ असून एवढ्या मोठ्या लोखसंख्येच्या गरजा सुद्धा तेवढ्याच असल्याने आर्थिक विकास मार्गक्रमाला खीळ बसत आहे.

२) भांडवल निर्मितीचा अभाव

विकसनशील देशात एकूण उत्पन्न आणि उत्पन्नात होणारी वाढ हि भांडवल निर्मितीच्या दरावर अवलंबून असते. भारतात भांडवल निर्मिती व तिचा दर कमी असल्याने उत्पादन कमी, रोजगार कमी, परिणामतः उत्पन्न कमी व बचत कमी त्यामुळे भांडवलाची कमतरता जाणवते.

३) तांत्रिक मागासलेपणा

भारतासारख्या राष्ट्रात उत्पादन कार्यात इतर राष्ट्राच्या तुलनेत तांत्रिक मागासलेपणा दिसून येतो. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उत्पादनाचा दर्जा ठरतो तसेच कमी खर्चात व कमी वेळेत वस्तू तयार होते. आधुनिक तंत्रज्ञान कमी असल्याने विकासाचा वेग राहतो.

३) तांत्रिक मागासलेपणा

भारतासारख्या राष्ट्रात उत्पादन कार्यात इतर राष्ट्राच्या तुलनेत तांत्रिक मागासलेपणा दिसून येतो. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उत्पादनाचा दर्जा ठरतो तसेच कमी खर्चात व कमी वेळेत वस्तू तयार होते. आधुनिक तंत्रज्ञान कमी असल्याने विकासाचा वेग कमी राहतो.

४) संशोधनावर कमी खर्च

भारतात संशोधनावर इतर राष्ट्राच्या तुलनेत खूपच कमी खर्च केला जातो. वस्तू मधील किंवा सेवांमधील नवनिर्मिती हि संशोधनाशिवाय शक्य नाही. गरजेनुसार वस्तू व सेवा तयार करण्यासाठी तसेच आर्थिक विकासाच्या दृष्टीने विकास कार्यात निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी संशोधन होणे आवश्यक असते. परंतु याबाबींकडे आपल्या देशात दुर्लक्ष होत आहे.

५) कुशल कामगारांचा अभाव

आजच्या काळात उत्पादन हे गुणवत्तेच्या आधारावर बाजापेठेत टिकते. असे दर्जेदार उत्पादनासाठी उत्तम तंत्रज्ञानासोबत कुशल कामगारांचीही आवश्यकता असते. आपल्या शैक्षणिक पद्धतीत कौशल्य आधारितपणा कमी असल्याने कुशल कामगारांचा आभाव दिसून येतो.

**भारतीय अर्थव्यवस्था विकासासाठी उपाय**

आजमितीस भारतीय विकासाच्या दुर्ष्टीने अनेक समस्या आहेत.परंतु यासंदर्भात काही उपाययोजना केल्यास आर्थिक विकासातील अडथळे दूर होऊ शकतात

१) देशाच्या आर्थिक विकासात संशोधनाचे अत्यन्त महत्व असून सर्व क्षेत्रात संशोधनावर भर दिल्यास आर्थिक विकासाला चालना मिळेल.

२) नवीन उद्योग निर्मिती केल्यास त्यातून नवीन रोजगार निर्मिती होईल या सोबतच बचतीतुन भांडवल निर्मिती होईल.

३) कौशल्य आधारित शिक्षण पद्धती विकसित केल्यास त्यातून कुशल कामगार निर्मिती होईल.

४) लोकसंख्या नियंत्रण कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी लागेल.

५) नवीन तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी धोरण ठवावे लागेल.

**सारांश**

भारत हे एक विकसनशील राष्ट्र असून विकासाकडे आपली वाटचाल आहे. आर्थिक विकासामध्ये अनेक समस्या आहेत. परंतु या समस्यावर मात केल्यास आर्थिक विकास होऊ शकतो. शाश्वत व सर्वसमावेशक विकासापुढील समस्यांच्या आढावा घेतला असता असे दिसते कि, दारिद्रय, बेरोजगारी व शेती क्षेत्राची घसरण या देशासमोरील प्रमुख समस्या आहेत. त्यामुळे आर्थिक विषमता वाढताना दिसते. जागतिक स्तरावरील अनिश्चिता वाढत आहे. युरो डॉलर व अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया दुबळा होत आहे. अनेक शासकीय योजना व धोरणाची योग्य अंमलबजावणी होत नाही. भारतीय अर्थव्यवस्था मुळात ही कृषीवर आधारित असल्याने नैसर्गिक परिस्थिती यावर राष्ट्रीय उत्पादन ठरते. तेव्हा आधुनिक शेती, आधुनिक उद्योग, नवीन तंत्रज्ञान या आधारावर विकासाकडे वाटचाल करता येईल. यासाठी शासकीय धोरण याला अनुरूप असणे अत्यन्त आवश्यक आहे. तसेच संशोधन करून या संशोधनाचा वापर हा विकासात्मक कार्यात होणे आवश्यक आहे तरच भारत जागतिक स्तरावर एक महासत्ता म्हणून उदयास येईल.

**संदर्भ**

१) भारतीय अर्थव्यवस्था, बी, ए, १ पाठयपुस्तक, शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर

२) भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास -भाग-२, प्रा. एन एल. चव्हाण, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव

३) भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टिक्षेप, प्रा. दि. आर. जगताप, प्रा. सौ. नीता वाणी, डॉ. मंगला जंगले , प्रा. दि जी. पाटील, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव

# शाश्वतआर्थिक विकासाकरिता पर्यावरण संरक्षणाची गरज

**कु.कांचन सुधाकर मडावी**
वाणिज्य विभाग, स्व.राजकमलजी भारती कला वाणिज्य आणि श्रीमती सुशिलाबाई रा.भारती विज्ञान महाविद्यालय आर्णी.

## सारांश

*विकास ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. सतत चालणारा विकास साधत असताना मानवाने नैसर्गिक संपत्तीचा वापर मोठ्या प्रमाणात केला आहे. मानव आणि पर्यावरण यांचा संबंध अतूट आहे. मानवाने पर्यावरणाच्या माध्यमातून आर्थिक विकासावर भर दिला आहे. पर्यावरणाचे संरक्षण आणि मानवी जीवन एकमेकांना पूरक आहे याची जाणीव झाल्यानंतर शाश्वत विकासाची संकल्पना पर्यावरण संरक्षण दृष्टिकोनातून स्पष्ट करण्यात आली. 'जो विकास मानवाच्या सध्याच्या आणि भविष्यकालीन गरजांची संतुलित पुर्ती करतो तोच शाश्वत विकास होय.' आज मानवाच्या विकासाबरोबर पर्यावरणीय संतुलन साधण्याची गरज जगाला जाणवू लागली आहे. दुसरे असे की, औद्योगिकीकरणामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा अपव्यय होऊ लागला. भविष्यातील पिढीला पुरेल इतकी नैसर्गिक साधनसंपत्ती शिल्लक ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी नैसर्गिक संसाधनाचा युक्ततम वापर केला पाहिजे. या विचाराचा म्हणजेच शाश्वत, टिकाऊ व निरंतर विकासाचा ज्वलंतमुद्दा जगापुढे निर्माण झाला व त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करणे ही काळाची गरज बनली आहे. प्रस्तुत लेखामध्ये पर्यावरणसंरक्षणाविषयी करण्यातयेणाऱ्या उपाययोजना तसेचशाश्वत विकासाचा प्रश्न इ. बाबींविषयी चर्चाकरण्याचा प्रयत्न केलाआहे.*

**प्रस्तावना –**

आधुनिक भौगोलिक व्यवस्थेमध्ये पर्यावरणीय सुरक्षा आणि शाश्वत विकासाचा विचार केंद्रस्थानी आला आहे. मानवी जातीच्या शांततापूर्ण आणि सर्वांगीण शाश्वत, टिकाऊ व चिरकाल विकासासाठी पर्यावरण संरक्षणाची अत्यंत गरज आहे. शाश्वत विकासाच्या संकल्पनेत वर्तमानकाळातील पिढीबरोबरच भविष्यातील पिढीचा विचार केला जातो. सुरुवातीच्या काळात नैसर्गिक संसाधनाची विपुलता होती. काळानुसार वाढलेली लोकसंख्या व त्यामुळे तंत्रविज्ञानाच्या प्रगती बरोबरच मनुष्याचा उपभोग घेण्याचा स्थरही उंचावत गेला. इतकेच नव्हे तर सर्वसामान्य जीवनामध्ये कृत्रिमसाधनांचे प्रयोग इतके वाढले की, त्यामुळे निसर्गच दूषित होऊ लागला. आर्थिक उद्दिष्टेसाध्य करण्याच्या धावपळीत पर्यावरणाच्या संरक्षणाकडेदुर्लक्ष झाल. म्हणून शाश्वत विकासाची संकल्पना पर्यावरणाच्या संरक्षणासोबतच पूर्ण करणे आवश्यक आहे. म्हणूनमनुष्य आणि निसर्गाचे तुटलेले संबंध पुन्हा जोडणे, मनुष्याच्या सामाजिक आणि राजकीय जीवनाला पर्यावरणप्रियआणि विनयशीलबनविणेआवश्यक आहे. समाजाचासर्वांगीण विकास करणे तसेच नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करून सामाजिक व आर्थिक विषमता दूर करणे, ही उद्दिष्ट अभिप्रेत आहेत . पर्यावरण संरक्षणाशिवाय शाश्वत आर्थिक विकास टिकाऊ होऊ शकत नाही. म्हणजेच सध्याच्या काळात नैसर्गिक संसाधनांचा वापर भविष्यातील पिढ्यांच्या गरजा लक्षात घेऊन केला पाहिजे. जेणेकरून आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात इच्छित संतुलन स्थापित केले जाऊ शकेल. शाश्वत विकासामध्ये आपण मनुष्याच्या विकासासाठी निसर्गाचा अशा प्रकारे वापर केला पाहिजे की, निसर्गाने पर्यावरणाला हानी पोहोचवूनये आणि निसर्ग व विकासामध्ये संतुलन राहू शकेल..

**शाश्वतविकास संकल्पनेचा उगम –**

मानव हा नैसर्गिक व सामाजिक पर्यावरणात जीवन जगत असतो. आर्थिक विकास आणि पर्यावरण यातील समन्वय साधने आवश्यक आहे. या अनुषंगाने 1972 सालीसंयुक्त राष्ट्राची मानवी पर्यावरणावरील परिषद (स्टॉकहोम) येथे आयोजित करण्यात आली. या परिषदेत मानवी कुटुंबाचे आरोग्यदायक व उत्पादक पर्यावरणासाठी असणारे घटक ठरविण्याबाबत औद्योगिक व विकासनशील राष्ट्रांमध्ये एकमत झाले. १९८० साली IUCN ने प्रसिद्ध केलेल्या जागतिक संवर्धन रणनीती मध्ये 'शाश्वत विकास' या संकल्पनेची पूर्वचिन्हे दिसूलागली .या रणनीतीमध्ये पर्यावरण संवर्धन आणि विकास यामधील परस्परावलंबन अधोरेखित करण्यात आले. त्यानंतर 1982 या वर्षी संयुक्त

राष्ट्रांच्या आमसभेत 'world charter of nature' स्वीकारण्यात आला. तदनंतर 1983 या वर्षात जागतिक पर्यावरण व विकास आयोगाची स्थापना करण्यात आली. 1984 मध्ये हा आयोग संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेची स्वतंत्र संस्था म्हणून कार्य करू लागली. हा आयोग पृथ्वीवरील सामाजिक पर्यावरणीय समस्यांचे निरीक्षण करून त्यावर वास्तववादी उपायोजनासाठी आणि पृथ्वीवरील संसाधने पुढील पिढीसाठी राखून त्यांचा उपयोग चालू पिढीसाठी शाश्वतरीता कसा करता येईल, यासाठी उपाययोजना शोधण्यासाठी नेमण्यात आला होता. या आयोगाचे अध्यक्ष नॉर्वेच्या पंतप्रधान ग्रो हारलेम ब्रुंड लंद ह्या होत्या. त्यावरून या आयोगाला ब्रुडं लांड आयोग असेही म्हणतात. या आयोगाने सादर केलेल्या 'our common future 'या अहवालात शाश्वत विकास ही संकल्पना व तिची व्याख्या सर्वप्रथम मांडण्यात आली.

**व्याख्या -**

1. "जोविकास चालू पिढीच्या गरजा पुढील पिढीच्या गरजा धोक्यात न आणता पूर्ण करतो त्या विकासात शाश्वत विकास असे म्हणतात."

- पर्यावरण आणि विकास जागतिक ब्रुनलँड आयोग 1987

2. "शाश्वत विकास म्हणजे सामाजिक उद्दिष्टांची बेरीज होय. त्यात दरडोई वास्तव उत्पन्नात वाढ, आरोग्य व पोषणात सुधारणा, शैक्षणिक प्रगती, संसाधनांच्या वापराचा अधिकार, उत्पादनाचे योग्य वाटप आणि स्वातंत्र्यात वाढ होते."

3."वर्तमानकालीन गरजांची पूर्तता करत असताना या प्रयत्नांचा परिणाम भविष्यकालीन गरजांवर होणार नाही ही बाब विचारात घेऊन साध्य केलेला विकास म्हणजे चिरंतर विकास होय. थोडक्यात पर्यावरणाची महत्त्व टिकवून ठेवणारा विकास म्हणजे शाश्वत विकास होय."

**शाश्वतविकासाची उद्दिष्टे -**

1. विकासाचे पुनरुज्जीवन करणे.
2. विकासाचा दर्जा सुधारणे.
3. रोजगार, अन्न, ऊर्जा, पाणी आणि स्वच्छता याबाबतीत गरजा पूर्ण करणे.
4. संसाधनाचे रक्षण आणि संवर्धन करणे.
5. तंत्रज्ञानाचा वापर करणे.
6. निर्णय प्रक्रियेमध्ये पर्यावरण आणि अर्थशास्त्राचा समावेश करणे.

थोडक्यात जागतिक स्तरावर टिकणारे आणि निश्चित उपजीविकेचे साधन उपलब्ध केल्यास संपूर्ण गरिबीमध्ये घट होईल की, ज्यामुळे साधन संपत्तीचा अपक्षय पर्यावरण अवनती, सांस्कृतिक विस्कळीतपणा आणि सामाजिक अस्थिरता कमी होईल. हे चिरस्थायी विकासाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**शाश्वतआर्थिक विकास पूर्तीसाठी आवश्यक असलेले बदल -**

1. मनुष्य व निसर्ग यांना भिन्न न मानता त्यांचे परस्पर अवलंबित्व स्वीकारणारा दृष्टिकोन विकसित करणे.
2. आर्थिक विकासाबरोबर पर्यावरणाचा ही विचार करण्याची अर्थव्यवस्था निर्माण करणे.
3. लोकसंख्येचे कमी जन्मदर व कमी मृत्यू दर अशा स्थिर स्थितीत लोकसंख्या संक्रमण होणे गरजेचे आहे.
4. अक्षय उर्जेवर अवलंबून राहून पारंपारिक ऊर्जा संक्रमण करणे.
5. संसाधनाचा वापर शाश्वत पद्धतीने करणे.
6. नैसर्गिक संपत्तीचा योग्य वापर करून मानव व सजीवांचे अस्तित्व टिकवणे.
7. जंगल तोड करताना त्याच प्रमाणात जंगल लागवड करणे.
8. सर्व सहभाग स्वीकारणारी व जागतिक तडजोडीचेप्रयत्न करणारी राजकीय व्यवस्थेची गरज निर्माण करणे.

**शाश्वतआर्थिक विकास आणि पर्यावरण-**

पर्यावरणआणि विकास यांचा जवळचा संबंध आहे, परंतु हे नाते आजचे नाही. प्राचीन काळातही या दोघांमध्ये संबंध होते. आणि प्लेटोला पर्यावरणाचे महत्त्व माहीत होते, त्यामुळे यासंदर्भात त्यांनी आपले मत व्यक्त केले. सार्वजनिक प्रशासनातीलपर्यावरण अभ्यासाचीकल्पना वनस्पतीशास्त्रातून स्वीकारली गेली आहे. ज्याप्रमाणे वनस्पतीसाठी योग्य हवामान, प्रकाश आणि बाह्य वातावरण आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सामाजिक संस्थेच्या शाश्वत आर्थिक विकासाकरिता पर्यावरण आवश्यक आहे. आज औद्योगिकीकरणामुळे विकासाच्या क्षेत्रात पर्यावरणाचे महत्त्व वाढले असून जगभर पर्यावरणाची चर्चा होत आहे. तसेच प्रदूषित पर्यावरणाला आळा घालण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

दुसऱ्या महायुद्धानंतर मोठ्या प्रमाणावर औद्योगिकीकरण आणि जंगलाचा नाश इ.मुळे पर्यावरण हि आपल्या काळातील सर्वात गंभीर समस्या बनली आहे. ही समस्या मानवीय स्वरूपाची आहे."नैसर्गिक संसाधनांचा ह्रास आणि पर्यावरणीय दबाव हे भविष्यात मानव आणि देशाच्या कल्याणासाठी खरेधोकेआहे यात शंका नाही."एकीकडे पर्यावरणाच्या ढासळत्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी जगाचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न सुरू असताना दुसरीकडे निसर्ग आणि मानवाची स्वावलंबनाची जाणीव वाढत आहे. या समजामुळेच विकास आणि पर्यावरण अभ्यासाचे महत्त्व वाढले आहे. आणि लोकांना हे समजले आहे की, त्यांचे अस्तित्व मानव आणि पर्यावरण यांच्यातील चांगल्या संबंधांवर अवलंबून आहे. पर्यावरणाच्या संसाधनाचे संरक्षण, सुधारणा आणि वापर ही विकास योजना आणि कार्यक्रमांच्या स्थापनेसाठी मार्गदर्शक तत्वे आहेत. तसेच विकास हा मानवाचा नैसर्गिक अधिकार आहे. या अधिकारांचा उपभोग घेताना नैसर्गिक संसाधनांचा अमर्यादित वापर केला जातो. त्यातून पर्यावरणाची अवनती होते. त्याचा अनिष्ट परिणाम वर्तमान पिढी बरोबरच भविष्यातील पिढीवरही होत असतो. म्हणून विकासाच्या अधिकाराबरोबर नैसर्गिक कर्तव्य आणि जबाबदारीची जाणीव होणे गरजेचे आहे.

शाश्वत आर्थिक विकास आणि पर्यावरणाचे संरक्षण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत .म्हणूनच आंतरराष्ट्रीय पातळीपासून ते स्थानिक पातळीपर्यंत दोन्ही संकल्पनांचा एकत्रित विचार केला जातो. शाश्वत विकासासाठी नैसर्गिक साधन संपत्तीची कमीत कमी हानी आणि पर्यावरणाचा महत्तम संयोग व आर्थिक विकास हा विचार नेहमी केंद्रस्थानी असला पाहिजे. भावी पिढीच्या गरजा भागविण्यासाठी निसर्गातील क्षमतेला कोणताही धक्का न लावता लोकांच्या आजच्या गरजा पूर्ण करणे म्हणजे धारणक्षण विकास होय. याचाच अर्थ निसर्ग नियमाच्या चौकटीत राहून निसर्गाला धक्का न पोहोचवता मानवाने स्वतःचा विकास विविध नैसर्गिक घटकांचा वापर करून करणे होय. नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर योग्य पद्धतीने करून शाश्वत विकासासाठी गरिबी व दारिद्र्याचे उच्चाटन करणे आणि पर्यावरण संरक्षण करणे काळाची गरज बनली आहे

**पर्यावरणसंरक्षणाबाबत विविध कायदे –**

सर्व जगत् ईश्वर रूप मानून आपल्याला कर्तव्याची जाणीव करून देऊन पर्यावरणाचे अमोलत्व जपणाऱ्या भारतात सर्वसमावेशक पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचा कायदा आवश्यक होता .1) 1972 मधील मानवी पर्यावरण जागतिक परिषदेचा संदर्भ घेऊन 1986 मध्ये कायदा करण्यात आला. त्यानंतर पर्यावरणीय संरक्षणाबाबत विविध कायदे करण्यात आले . आर्थिक विकास करताना पर्यावरणाच्या रक्षणाची व शाश्वत विकासाची जबाबदारी प्रत्येक व्यक्तीची आहे .2) 1991 मध्ये पर्यावरणाच्या दृष्टीने शाश्वत विकास करण्यासाठी वातावरणातील हवेची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी हवा प्रदूषण नियंत्रण कायदा अस्तित्वात आला .3)1986 मध्ये पर्यावरण संरक्षण कायदा संयुक्त राष्ट्र परिषदेत पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी भारत सरकारने पर्यावरण संरक्षण कायदा अस्तित्वात आणला.4) 1974 मध्ये पर्यावरण संरक्षण व सार्वजनिक आरोग्यांच्या हिताने भारत सरकारने जलप्रदूषण प्रतिबंध नियंत्रण कायदा पारित केला. 5)1972 मध्ये केंद्र सरकारने पर्यावरण आणि वन विभागाला वन्यजीव संरक्षण कायदा अधिकार प्रदान करण्यात आला. 6) 1992 सालीझालेल्या 'रिओ दि जनेरो' (ब्राझील) येथील वसुंधरा शिखर परिषदेमध्ये अजेंडा २१ मान्य करण्यात आला. अजेंडा २१ नुसार ब्रूनलँडआयोगाने शाश्वत विकासासाठी सांगितलेल्या शिफारसींचा योग्य पाठपुरावा करण्यासाठी शाश्वत विकास आयोग स्थापन करण्यात आला. हा आयोग संयुक्त राष्ट्राच्या पर्यावरण व विकास कामांचे समन्वय करतो.

शाश्वत कृषी हे भारतामध्ये उद्दिष्ट ठरविण्यात आले. कृषी विकास आराखडा 1999 मध्ये राष्ट्रीय शाश्वत विकास आणि ग्रामीण विकास आराखडा म्हणून स्वीकारण्यात आला. व National sustainable Agriculture and Rural Development (SARD) strategy अंतर्गत शेतीविषयक कामे केली जाऊ लागली. ज्यामध्ये अंतर्गत फलशेती विकास, त्या त्या क्षेत्रांना अनुकूल पिकांची शेती, पाणलोट क्षेत्र विकास, मृदा व जलसंवर्धन, कृषी संशोधन, जैविक खते व तंत्रज्ञानाचा वापर इ. कामे करण्यात आली. पर्यावरणीय कायद्यानुसार निरनिराळयाक्षेत्रांमध्ये जागृती करून कायद्याची

अंमलबजावणी होत आहे व पर्यावरणाचे संरक्षण होत आहे.

**शाश्वतआर्थिक विकासात पर्यावरण संरक्षणाबाबत उपाययोजना –**

1. नैसर्गिक संसाधनाच्या असमान वितरणावर उपाययोजना करणे.
2. संसाधनाचा शाश्वत वापर करणे.
3. संसाधनाचे प्रभावी नियोजन करणे.
4. संसाधनाच्या नियोजनात स्थानिक ज्ञानाचा वापर करून घेणे.
5. संसाधनाचेयोग्य मूल्य मूल्यांकन करणे.
6. पर्यावरण संरक्षण कायद्याचे पालन करणे.
7. तंत्रज्ञानाचा योग्य वापर करणे.
8. संसाधनाचे संरक्षण व संवर्धन करणे.
9. शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणासाठी सामुदायिक भूमिकेतून कार्य केले पाहिजे.
10. भावी पिढीचा विचार करून नैसर्गिक साधनसंपत्तीचा काटकसरीने वापर करावा.
11. पर्यावरण प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न करणे व त्यासाठी लोकशिक्षण देणे.

**निष्कर्ष –**

1. शाश्वत विकास पर्यावरणाच्या गरजांमध्ये स्थिरता आणतो.
2. भविष्यातील पिढ्यांनावापरण्यासाठी संसाधने उपलब्ध करते.
3. निसर्गाने दिलेल्या संसाधनांचेजतन करण्याचा अद्‌भुत मार्ग आहे.
4. उपलब्ध साधनसामग्री शाश्वत पद्धतीने वापरली जातील.
6. संसाधन वापरामुळे जे बदल घडू शकतात त्यासाठी वेळेवर तरतूद केली पाहिजे.

**संदर्भ–**

1. शेलकरअभया, 'पर्यावरण संरक्षण कायदा' नाशिक लॉ हाऊस औरंगाबाद, 2004.
2. पवार किशोरआणि इतर, 'पर्यावरण विज्ञान' प्रगती बुक्स प्रा.लि. 2006.
3. झामरेजी. एन. (डॉ) 'भारतीय अर्थशास्त्र विकास व पर्यावरण' पिंपळापुरे पब्लिकेशन नागपुर ,2004.
4. सवदी अरुण, 'आपले पर्यावरण' निराली प्रकाशन पुणे, 2007.
5.www.environmentalpollution.com
6.www. sustainabledevelopment.com
7.www.environment/sustainabledevelopment.com

# डिजिटल करन्सी (e-Rupee):एक दृष्टिक्षेप

**प्रा. डॉ. अमोल सतीश राऊत**
सहायक प्राध्यापक, वाणिज्य विभाग, बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ
amolraut1981@gmil.com

---

## गोषवारा (Abstract):

*भारतीयरिझर्व बँकेने डिजिटल करन्सी(e-Rupee) देशामध्ये लागू करीत असतांना ती संपूर्ण देशात लागू न करता सुरुवातीला पायलट तत्वावर देशातील काही शहारामध्ये लागू केली. भारतीयरिझर्व बँकेने डिजिटल करन्सीचे दोन भागात विभाजन केले आहे. एक किरकोळ(रिटेल) आणि दुसरे घाऊक (होलसेल). रिटेलचा उपयोग सर्व सामान्य नागरिकांना दैनंदिन व्यवहार पार पाडण्याकरिता होईल, तर होलसेलचा उपयोग मोठमोठ्या वित्तीय संस्था आपले व्यवहार पार पाडण्याकरिता करतील. पहिला टप्पा म्हणूनहोलसेल सेगमेंटची सुरुवात दि. १ नोव्हेंबर २०२२ पासून सुरु केली आहे, तर दुसरा टप्पारिटेल सेगमेंटची सुरुवात दि. १ डिसेंबर २०२२२पासून केली आहे. भारतीय रिझर्व बँकेने संपूर्ण देशातडिजिटल करन्सी(e-Rupee) सुरुवातीला दिल्ली, मुंबई, बेंगलुरु आणि भुवनेश्वर या चार मोठ्या शहरांमध्ये पायलट स्वरूपात ही योजना सुरु केली. यानंतर दुसऱ्या टप्प्यात अहमदाबाद, गंगटोक, गुहावटी, हैदराबाद, इंदोर, कोची, लखनऊ, शिमला आणि पटना या शहरांमध्ये ई-रुपीही डिजिटल करन्सीपायलट स्वरूपात सुरु केलीजाईल. पहिल्या टप्प्यात SBI, ICICI, YESBank आणि IDFCFirstBank या बँका ही सुविधा उपलब्ध करून देतील तर दुसऱ्या टप्प्यात Bank of Badoda, Union Bank, HDFC Bank, आणि Kotak Bank या बँकासुद्धा या पायलट प्रोजेक्टमध्ये समाविष्ट होतील.* भौतिक स्वरूपातील करन्सी प्रमाणेचई-रुपी उपयोगात आणता येते. *वस्तूची खरेदी केल्यानंतर ज्या कागदी नोटाद्वारे व्यवहार केले जातात, त्या ऐवजी आता ही डिजिटल रुपये म्हणजे ई-रुपी द्वारे व्यवहार केले जातील. या डिजिटल नोटा फाटणार नाहीत तसेच एटीएमवर जाऊन विड्रॉ करण्याची गरज राहणार नाही. ई-रुपीपैशाचे पेमेंट डिजिटल स्वरूपात होतील.*

---

**की वर्डस :Key Words** रिटेल-होलसेल - ई-रुपी - डिजिटलकरन्सी-यूपीआय-ऑनलाइन - क्रिप्टो करन्सी - CBDC वॉलेट.




डिजिटल करन्सी(e-Rupee)

**संशोधनाचे उद्देश: (Objectives of the research)**

१) डिजिटल करन्सीचा अभ्यास करणे.
२) क्रिप्टो करन्सी समजून घेणे.
३) डिजिटल करन्सी लागू करण्याची पद्धत समजून घेणे.
४) डिजिटल करन्सी सुरू करण्या मागील कारणमीमांसा अभ्यासने.

**संशोधन पद्धती: (Research Methodology)**

सन 2009मध्ये पहिल्यांदा क्रिप्टो करन्सी बिटकॉइन म्हणून जन्माला आली, नंतरच्या काळात जशी क्रिप्टो करन्सीचे मूल्य वाढत गेले, तेव्हापासून ती कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था किंवा बँकिंग प्रणाली यासाठी घातक होऊ लागली. क्रिप्टो करन्सीचे अर्थव्यवस्थेतील प्रमाण वाढले तर केंद्रीय बँक पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवू शकणार नाही. क्रिप्टो करन्सी मौद्रिक धोरणाला सुद्धा प्रभावित करू शकते, अशा वेळेस देशात अशी करन्सी स्थिर होईल जिथे मूल्य स्थिर नाही. कारण दोन व्यक्ती जवळ एकसारख्याच असलेल्या क्रिप्टो करन्सीचेत्याचे मूल्य वेगवेगळे असू शकते. भारतीयरिझर्व बँकेने डिजिटल करन्सी लाँच करण्यामागील महत्त्वाचे कारण म्हणजे, भारतीय अर्थव्यवस्थेला क्रिप्टो करन्सीच्या

धोक्यापासून वाचविण्यासा डिजिटल करन्सी निर्माण करण्यात आली. देशाच्या मौद्रिक प्रणालीला जर तंत्रज्ञानाची जोड मिळाली तर देशाची मौद्रीक प्रणाली मजबूत होईल. याच ध्येयाने प्रेरित होऊन डिजिटल करन्सी: एक दृष्टिक्षेप हा विषय प्रस्तुत संशोधनासाठी निवडण्यात आला.

प्राथमिक तथ्य संकलन तसेच दुय्यम तथ्य संकलनामध्ये प्रकाशित व अप्रकाशित अहवाल, माहिती पुस्तिका, शोध प्रबंध तसेच संकेतस्थळ या साधनांचा उपयोग करण्यात आला.

**प्रस्तावना: (Introduction)**

आज खिशामध्ये कागदी चलन घेऊन व्यवहार करण्याची आवश्यकता नाही. वित्तीय वर्ष 2022-23मध्ये अर्थमंत्री निर्मला सीताराम यांनी ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित डिजिटलकरन्सी ई-रुपीनिर्माण करण्याचा निर्णय घेतला. डिजिटलकरन्सी केंद्रीय बँकेद्वारा वितरित केलेल्या मुद्रेचे डिजिटल स्वरूप आहे. केंद्रीय बँकेनुसार डिजिटल करन्सीच्या ई-रुपीचा उद्देश प्रचलित मौद्रिक चलनाला पर्याय नसून तो पूरक आहे. उपभोक्त्याला पैशाचे पेमेंट करण्यासाठी दिलेला तो अतिरिक्त विकल्प आहे. नागरिक, उद्योगपती, सरकार आणि इतरांसाठी व्यवहार करण्याकरिता डिजिटल करन्सी लीगल टेंडर म्हणून वितरित आहेत. डिजिटल रुपया लागू केल्यामुळे सरकारी खर्च कमी होतो तसेच डिजिटल रुपयामुळे नकली करन्सीवर प्रतिबंध लागतो.येणाऱ्या काळामध्ये डिजिटल रुपया हा अर्थव्यवस्थेसाठी एक गेमचेंजर ठरेल.

वर्तमान स्थितीत हीच सुविधा आपल्याला यूपीआयच्या(UPI) माध्यमातून गुगल-पे, फोन-पे किंवा पेटीएम द्वारे मिळत आहे.UPIद्वारे केले जाणारे कॅशलेस व्यवहार सुद्धा ई-रूपी या डीजीटल करन्सीव्दारे केले जातील. मग असे असताना ई-रूपीची गरज का पडली?तर याचे उत्तर असे की, सर्व पेमेंट यूपीआय द्वारे केले जात नाही,काही व्यवहार हे खाजगी स्वरूपाचे असतात, त्याची माहिती इतरांना द्यायची नसते, बऱ्याच ठिकाणी त्याचा संदर्भ द्यायचा नसतो,परंतु यूपीआय पेमेंटमध्ये हे शक्य नाही, कारण यूपीआयव्दारे केल्या जाणाऱ्या प्रत्येक व्यवहाराची नोंद ठेवली जाते. बँक स्टेटमेंट मध्ये त्याचे पूर्ण डिटेल येतात. दैनंदिन व्यवहारामध्ये बऱ्याच व्यक्तींना ऑनलाइन पेमेंट नको असते, त्यांना कागदी नोटा अपेक्षित असतात, याच गरजेला विचारात घेऊन भारतीय रिझर्व बँकेने ई-रुपी ही डिजिटल करन्सी लॉन्च केली आहे.ई-रुपीव्दारे केले जाणारेव्यवहार ऑनलाइनच केले जातात, परंतु बँकेला किंवा सरकारला हा पैसा कुठून आला आणि कुठे गेला याची माहिती मिळणार नाही, तसेच तुमच्याजवळ किती ई-रुपी आहेत, याचा हिसेब ठेवला जाणार नाही. म्हणजेच ई-रुपीट्रॅक केले जाणार नाही. कागदी पैसे काढण्यावर आणि जमा करण्यावर ज्या मर्यादा आहेत, त्याच मर्यादा ई-रुपी या डिजिटल करन्सीला सुद्धा लागू राहतील. डिजिटल करन्सीवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही. डिजिटल करन्सीचे सर्क्युलेशन पूर्णपणे गोपनीय राखले जातील, त्यावर भारतीयरिझर्व बँकेचे नियंत्रण असेल.

**डिजिटल करन्सीकसीजमा केली जाते?(How is digital currency deposited?)**

ज्याप्रमाणे कागदी नोटा ठेवण्यासाठी आपल्याला खिसा किंवा वॉलेटची आवश्यकता असते, त्याचप्रमाणे डिजिटल करन्सी ठेवण्यासाठी (Central Bank Digital Currency-CBDC)वॉलेटची आवश्यकता असते. ज्यामध्ये ही डिजिटल करन्सी जमा केले जाते. बँकेला विनंती केल्यानंतर बँक कागदी नोटा ऐवजी ग्राहकाच्याCBDCवॉलेटमध्ये डिजिटल करन्सीजमा करते. एखाद्या व्यक्तीच्या वॉलेटमध्ये 500दोन नोटा,200रुपयाची एक आणि 100रुपयाची एक नोट असे एकूण 1300रुपये जमा असतील आणि कागदी नोटाच्या एवजी ऑनलाईन वॉलेटमध्ये डिजिटल करन्सी पाहिजे असेल तर 500 दोन नोटा,200रुपयाची एक आणि 100रुपयाची एक नोट असे एकूण 1300रुपये बदलून घेता येतील. याकरता CBDCवॉलेटच्या मोबाईल □पला डाऊनलोड करावे लागेल. बँक आपल्या ग्राहकाला ही सुविधा उपलब्ध करून देते. ज्याप्रमाणे डिमॅट अकाउंट मध्ये शेअर जमा असतात, त्याचप्रमाणे CBDCवॉलेटमध्ये इ-रुपी जमा असतात. प्रचलित करन्सीनुसार ज्या मूल्याच्या नोटा अर्थव्यवस्थेमध्ये उपलब्ध आहेत, त्याच मूल्याच्या ई-रुपी डिजिटल करन्सी उपलब्ध करून मिळतात.

**डिजिटल करन्सी काम कसे करते?(How Digital Currency Works)**

वस्तूची खरेदी करण्याकरता ज्याप्रमाणे आपण कागदी नोटांचा उपयोग करतो, त्याचप्रमाणे इ-रुपीचा

उपयोग करून आपल्याला वस्तूंची खरेदी करता येते.ऑनलाइन पद्धतीने पैशाचे पेमेंट करताना जसे आपण क्यूआर कोड (QR Code) स्कॅन करतो, तसाच क्यूआर कोड या ठिकाणी स्कॅन केल्यानंतर ग्राहकांच्या वॉलेट मधील ई-रुपी दुकानदाराच्या वॉलेट मध्ये जमा होतात.सर्वात महत्वाचे म्हणजे ई-रुपीच्या डिजिटल करन्सीच्या ऐवजी आवशकता असल्यास सामान्य करन्सी बदलून घेता येवू शकतो.

**यूपीआय पेमेंट आणि डिजिटल करन्सी यामधील फरक: (Difference Between UPI Payment and Digital Currency)**

बँक बाजार डॉट कॉमचे सीईओ आदिल शेट्टी यांच्या मतानुसार UPIच्या माध्यमातून जे पेमेंट केले जाते ते डिजिटल स्वरूपात होत असले तरी बँकांमधील देण्याघेण्याचे व्यवहार हे नगदी स्वरूपातच केले जातात. उदाहरणार्थ, एका बँकेच्या ग्राहकाने दुसऱ्या बँकेच्या ग्राहकाला UPI च्या माध्यमातून जेवढे पेमेंट केले असेल, तेवढेच पेमेंट बँका आपापसातील व्यवहाराचे क्लीअरन्स करण्याकरिता नगदीने करतात.

डिजिटल करन्सीच्या माध्यमातून होणारे देणे-घेण्याचे व्यवहार UPIपेमेंट पद्धतीपेक्षा थोडे वेगळे आहेत. प्रचलित कागदी नोटाद्वारे जसे आपण व्यवहार करतो, तसेच व्यवहार आरबीआय द्वारे निर्मित डिजिटल करन्सीद्वारे केले जातात.

**डिजिटल करन्सी आणि क्रिप्टो करन्सी मधील फरक: (Difference Between Digital Currency and Crypto Currency)**

१) भारतीयरिझर्व बँक डिजिटल करन्सीला लागू करीत असल्यामुळे डिजिटल करन्सी पूर्णपणे सेंट्रलाइज्ड आहे, तर क्रिप्टो करन्सी पूर्णपणे डिसेंट्रलाइज आहे. ती कुठून येत आहे, कोठे जात आहे याची माहिती कोणालाच मिळत नाही.
२) डिजिटल करन्सीला पूर्णपणे कायदेशीर चौकट आहे (लीगल फ्रेमवर्क) तर क्रिप्टो करेंसीची कोणतीही कायदेशीर चौकट, कायदा किंवा नियम नाही.
३) डिजिटल करन्सी केंद्रीय बँकेद्वारे नियमित (Regulated)होते तर क्रिप्टो करन्सी ही कुठल्याही ऑथॉरिटीद्वारे नियमित होत नाही.
४) डिजिटल करन्सी निश्चित आणि स्थिर मूल्याची असेल तर क्रिप्टो करन्सीचे मूल्य मागणी आणि पुरवठा यावर आधारित असेल.
५) डिजिटल करन्सी मध्ये ग्राहकांची ओळख असेल तो पैसा कोणाचा आहे, कुठे चालला आहे आणि कुठून येत आहे, याची माहिती मिळते तर क्रिप्टो करन्सी कोण वापरत आहे, कोण तयार करीत आहे, याची कुठल्याही प्रकारची माहिती मिळू नाही.

**डिजिटल करन्सीचे फायदे: (Advangages of Digital Currency)**

१) डिजिटल अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना मिळेल.
२) करन्सी मॅनेजमेंट सिस्टीम स्वस्त आणि प्रभावी होईल.
३) डिजिटल करन्सीच्या व्यवहाराला ट्रॅक केले जाईल, ज्यामुळे धोका टाळता येईल.
४) डिजिटल करन्सीमुळे पैसा सुरक्षित राहील.
५) प्रचलित कागदी नोटा कमी छापाव्या लागतील, त्यामुळे नोटा छापण्याचा खर्च कमी होईल.
६) डिजिटल करन्सीचे कॅश मध्ये रूपांतर करता येईल.
७) डिजिटल करन्सी क्रिप्टो करन्सीचे कायदेशीर रूप असेल.
८) डिजिटल करन्सीमुळे ट्रांजेक्शन कॉस्ट कमी होईल.

**डिजिटल करन्सीच्या मर्यादा: (limitation of digital currency)**

१) CBDCवॉलेटमध्ये २०,००० रुपयांच्या वर इ-रुपी डिजिटल करन्सी जमा करता येणार नाही.
२) एका दिवसामध्ये ३० च्या वर व्यवहार करू शकणार नाहीत.

यूपीआय पेमेंट मध्ये बरेचदा फसवे व्यवहार होण्याचा धोका असतो काही व्यक्ती मोबाईल मधील खोटे पेमेंट □प वापरून पैशाचे पेमेंट झाल्याचे दर्शवून फसवणूक करू शकतात. ग्राहक आणि व्यापारी यांच्यात अमोरासमोर व्यवहार (Front End Transaction) होत असल्यामुळे पैसे व्यापाऱ्याला प्राप्त झाल्याचे

ग्राहक दाखवू शकतो, परंतु व्यापारी आणि बँक यांच्यामध्ये (Back End Transaction) होत असल्यामुळे बरेचदा बँकेकडून व्यापाऱ्याला तुरंत पैसे प्राप्त होत नाहीत. त्यामुळे व्यापाराचे नुकसान होण्याची शक्यता असते. डिजिटल करन्सीमध्ये (Front and Back End Transaction) एकाच वेळेस होत असल्यामुळे इथे धोका होण्याची संभावनाच नसते.

**समारोप:**

डिजिटल करन्सी आल्यामुळे कॅश पेमेंट किंवा यूपीआय पेमेंट संपुष्टात येणार नाही तर ग्राहकाला वरील दोन पर्याय सोबत डिजिटल करन्सी हा तिसरा पर्याय उपलब्ध होईल. शंभर रुपयाची एक नोट छापण्यासाठी 15ते 17रुपये खर्च येतो. वित्तीय वर्ष 2022-23मध्ये देशातील मुद्रेचा पुरवठा सर्कुलेशन 31,05,721करोड रुपये आहे. सदर वर्षात 2,225करोड रुपयांच्या नोटा छापल्या आहेत. नोटा छपाई वरील एकूण खर्च 4,984करोड रु. आला. डिजिटल करन्सीचे प्रमाण वाढले तर उपरोक्त छपाईचा खर्च कमी होईल.डिजिटल करन्सीमुळे पैसा सुरक्षित राहील.ट्रांजेक्शन कॉस्ट कमी होईल.नकली नोटांवर प्रतिबंध लागेल. उपरोक्त सर्व कारणास्तव येणाऱ्या काळामध्ये डिजिटल रुपया हा अर्थव्यवस्थेसाठी एक गेमचेंजर ठरेल.

**संदर्भग्रंथ सूची**


१) https://www.youtube.com/watch?v=dkaC1tDrKk&t=47s

२) https://www.aajtak.in/business/utility/story/what-is-rbi-digital-rupee-how-you-can-use-know-all-details-in-5-minutes-tutc-1565999-2022-11-01

३) https://www.zeebiz.com/hindi/banking/rbi-digital-currency-first-pilot-project-of-retail-digital-rupee-or-common-man-from-today-how-it-works-know-details-106407

४) https://www.jagran.com/news/national-where-to-get-rbi-digital-rupee-how-it-will-work-what-are-it-benefit-get-detail-here-jprime-23246771.html

५) https://youtu.be/avKhCjGMzq0

६) https://youtu.be/XEBEmj5Z_Tc

# समकालीन समाज स्वास्थ्यासाठी श्रीचक्रधर यांच्या विचारांची उपयुक्तता

**डॉ अण्णा वैद्य**
मराठी विभागप्रमुख, श्रीमती नरसम्मा, महाविद्यालय,किरण नगर, अमरावती.

**प्रस्तावना**

कोणताही समाज भूस्थलावर स्थिरावल्यानंतर आपल्या अस्तित्वासाठी नाना तऱ्हेने प्रयत्न करत असतो. एखादा समाज गट प्रगत अवस्थेत आला की, अनेक परिवर्तने अशा समाजात घडत असतात. समाजामध्ये वेगवेगळे विचार प्रवाह नव्याने प्रवेशित होतात, जुने विचार प्रवाह काल बाह्य होतात, अशा प्रगत समाजामध्ये विज्ञानाची कास धरणारी काही मंडळी पुरोगामी म्हटल्या जाते, तर धार्मिक अंगाने जगणारी, देवावर श्रद्धा असणारी, मंडळीही त्यांचा देव धर्म सांभाळून प्रगत समाजात आपले एक स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवत कार्य करीत असतात. इतर समाज या गटाकडे काहीसा दुर्लक्ष करीत असला तरी, या गटाची आचरणाची पद्धती आणि त्यांनी स्वतःवर लादून घेतलेल्या वेगवेगळ्या नियंत्रणामधून त्यांचे स्वयंभू अस्तित्व समाजाला प्रभावित करीत असते. हा गट अथवा समूह एका विशिष्ट पंथ अथवा समुदाय नावाने ओळखल्या जातो. महाराष्ट्रामध्ये बाराव्या शतका स्थापन झालेला 'महानुभाव पंथ' हा अशाच पद्धतीने स्वतःची ओळख निर्माण करण्यात यशस्वी झालेला पंथ आहे. समाजात नैतिक अधिष्ठानावर कायमस्वरूपी उभा असलेला हा पंथ आहे. आज या पंथाचे विचार वर्तमान सामाजिक स्वास्थ्यासाठी नक्कीच फलदायी ठरणार आहे.

**महानुभाव पंथाची संक्षिप्त ओळख-**

सर्वज्ञ श्रीचक्रधर यांनी महाराष्ट्रात आठशे वर्षांपूर्वी बाराव्या शतकात महानुभव पंथाचे विचार नव्याने स्थापित केले. याआधी या पद्धतीचा विचार आचाराने जगणारा समूह हजारो वर्षापासून ईश्वरीय अवताराचे भक्ती करीत समाजामध्ये जगत होता. याच सात्विक, विचार आचाराला प्रवर्तित केले. महानुभावीय धर्माच्या तत्व विचाराचे मूळ सांगतांना श्रीचक्रधर यांनी त्रेतायुगातल्या श्रीदत्त अवताराशी महानुभाव पंथाच्या विचारधारेशी ही परंपरा जोडली आहे. हा पंथीय विचार खूप प्राचीन, प्रगत विचार आहे. श्रीचक्रधरांनी एका सूत्रात सांगितले आहे की "या मार्गाची अधिकारण श्रीदत्तात्रेय प्रभू " यावरून या पंथाचा आचार विचाराची सुरुवात ही त्रेतायुगात म्हणजे अंदाजे आठ लाख वर्षांपूर्वी झाल्याचे आपल्याला दिसते.या प्राचीन आचार विचाराला द्वापारयुगात श्रीकृष्ण अवताराने भगवद्गीतेच्या माध्यमातून हा सात्विक आचार विचार आपल्या श्रीवाणीतून कुरूक्षेत्रावर संभ्रमित अवस्थेत असलेल्या अर्जनाला सांगितला. श्रीचक्रधरांनी नव्याने मराठी भाषेत तत्त्व निरूपण करुन पुनर्स्थापना केली. हाच तो 'महानुभाव पंथ' आहे. या पंथाचे स्वतंत्र तत्त्वज्ञान असून अवतारांची परंपरा श्री चक्रधरांनी सांगितली आहे. आज पर्यंत या कर्म भूमीत पाच ईश्वर अवतार होऊन गेले आहेत. महानुभावांचा आचार विचार सर्व सामान्य जीवा करीता कठोर असून, उद्धरण हे अंतिम ध्येय या तत्त्व विचारांमध्ये समाविष्ट आहे.

जीवाच्या उध्दरणासाठी ईश्वराचा अवतार होतो. त्यासाठी जीवाने ईश्वराची अखंड नामस्मरण करून त्याची भक्ती केली पाहिजे. सतत ईश्वराला आठवलं पाहिजे. जीवाने उद्धरणासाठीची विनंती ईश्वराकडे केली पाहिजे. त्यासाठी अखंड साधना केली पाहिजे. शूद्र फळ देणाऱ्या देवता भक्तीत जीव अडकला तर तो उध्दरणास पात्र राहणार नाही. जीवाने तात्कालिक फळ देणाऱ्या देवतांच्या अधीन न होता सर्वोच्च फळ देणाऱ्या ईश्वराकडे याचना केली पाहिजे. जन्म मृत्यूच्या फेरीतून दुःखातून अज्ञानातून जीवाने स्वतःची सुटका केली पाहिजे, मानव देहामध्ये जीवाच्या उद्धरणासाठीची प्रक्रिया पूर्ण होऊ शकते, हे जाणून प्रत्येक जीवाने ईश्वर चिंतनात रममान व्हावे. असे श्रीचक्रधर स्वामींनी सांगितले आहे. श्रीचक्रधरांनी ज्या काळात हे तत्त्वज्ञान सांगितले तो काळ महाराष्ट्रात व सर्वत्र हिंदुस्थानात चातुर्वर्ण समाजव्यवस्था होती, सर्वत्र परंपरागत वैदिक हिंदू धर्माचे वर्चस्व होते, चार वर्णा पैकी वरिष्ठ वर्णाला आध्यात्मिक पातळीवर वेगवेगळे अधिकार होते. उरलेल्या तीन वर्ण ज्ञानग्रहणाचा, आध्यात्मिक गोष्टींचा अधिकार नव्हता. स्त्री वर्गाची चारही वर्णांत उपेक्षा होत होती. बहुजनांची तर खूपच वाईट अवस्था होती. ते अज्ञानाच्या गर्तेत गडप झाले होते. ज्ञान त्यांच्यापासून कोसो दूर होतो समाजात त्यांची अत्यंत दयनीय अवस्था होती. वरिष्ठवर्णी यांनी

खालील तीनही वर्णांना आपल्या धार्मिक सत्तेखाली, साम्राज्यखाली, सत्तेच्या टाचे खालीचिरडले होते. गुलाम केले होते.

बहुजन समाजाला 'आत्मज्ञान' देण्यासाठी, त्याला सत्याची ओळख करून देण्यासाठी, जीवाच्या उद्धरणाचा विचार सांगण्यासाठी, श्रीचक्रधरांनी पैठण या गावापासून सुरुवात केली. गावोगावी हिंडून भक्तांकडे जाऊन त्यांना मार्गदर्शन केले. उद्धरणाचे सूत्र, जीवाच्या मुक्तीचा खरा मार्ग त्यांनी प्रतिपादन केला. श्रीचक्रधरांच्या या भ्रमंतीमध्ये त्यांना असंख्य शिष्य मिळत गेले. हे शिष्य श्रीचक्रधरांच्या सोबत पायी प्रवास करीत गावोगावी मुक्कामी राहत होते. त्यांना सर्वज्ञांच्या अचाट सामर्थ्याची प्रचीती आली होती. त्यांनी श्री चक्रधर यांचा विचार सर्वत्र पसरविला. या महानुभाव पंथाच्या आचार विचाराचे प्रसारण सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामी यांनी आठ वर्ष सतत महाराष्ट्रात व महाराष्ट्र बाहेर केले. ते उत्तर दिशेला निघून गेल्यानंतर त्यांच्या शिष्य परिवारांनी हा उद्धरणाचा विचार व जिवाच्या मुक्तीचा ज्ञानाचा विचार लेखणीच्या माध्यमातून, शिष्य परंपरेच्या माध्यमातून सर्वदूर पोहोचवला. एक मोठी चळवळ महाराष्ट्रात महानुभाव पंथ या नावाने निर्माण झाली. पुढे या चळवळीला गती मिळाली. नागदेवाचार्य पासून सुरू झालेली ही आचार्य परंपरा आजतागायत सुद्धा सुरू आहे. महानुभाव पंथाच्या विचाराचा उदो उदो सर्वत्र होत असताना मुस्लिमांचे आक्रमण झाले. या आक्रमणामध्ये महानुभाव पंथीयांच्या लेखकांनी लिहिलेल्या ग्रंथसंपदेची नासधूस झाली. सर्वत्र पळापळ झाली. अशाही परिस्थितीत कट्टर महानुभाव विचाराच्या पाईक असणाऱ्या महंत मंडळींनी, भक्तांनी या सर्व साहित्याचे पुनर्लेखन केले. हे साहित्य मौलिक असून ते नासधूस होऊ नये, त्यामध्ये बदल होऊ नये, ते जसे आहे तसे रहावे म्हणून सांकेतिक लिपित ते लिहिले गेले, कारण हे साहित्य मौलिक होते. या साहित्यामध्ये सर्वज्ञ श्रीचक्रधरांची ‘जीवउद्धारक’ अशी तत्त्वे होती, सूत्रे होती. ही संपूर्ण साहित्य परंपरा मानवी उन्नतीसाठी हितकारक होती. म्हणूनच ते साहित्य सांकेतिक लिपिक लिहून सुरक्षित करावे असे तत्कालीन लेखकांना वाटले. त्यामध्ये प्रामुख्याने उत्तर महाराष्ट्रातील रवळोव्यास यांनी पुढाकार घेतला व एक लिपी शोधून काढली. संपूर्ण साहित्य लिपी मध्ये रूपांतरित केले. असं सांकेतिक लिपिक लिहिल्या गेलेले ‘महानुभाव साहित्य’ चारशे पाचशे सांकेतिक लिपीतच होते. नंतर मात्र अलीकडल्या एकोणिसाव्या शतकात सांकेतिक लिपी पासून हे साहित्य देवनागरी लिपीत रूपांतरित करण्याचे कार्य तत्कालीन काही महंत मंडळी व जिज्ञासू संशोधक मंडळींनी हाती घेतले. जनसामान्यांसाठी देवनागरी लिपीतून आज संपूर्ण महानुभावांचे काव्यग्रंथ, गद्य,चरित्र ग्रंथ इतर संकीर्ण ग्रंथ, भाष्य ग्रंथ, सूत्रपाठ उपलब्ध आहे. असे हे विपुल मराठीतील ज्ञान भंडार जनतेच्या कल्याणासाठी, जनतेच्या हितासाठी, जीवाच्या उन्नतीसाठी उपलब्ध असून, समाजाने या पंथाच्या वाङ्मयाचा अभ्यास करून आपली प्रगती करावी.

ज्ञान संपादन करावे.

सर्वज्ञ श्री चक्रधर हे गुजरात मधून महाराष्ट्रात आले. ते अलौकिक असे पुरुष होते हे त्यांच्या सहवासातील भक्तांना माहीत होतं कारण तसे अनुभव त्यांना आले होते. मध्ययुगीन साहित्याचे संशोधक डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी श्री चक्रधराच्या वेद शक्तीच्या संदर्भात एक महत्त्वपूर्ण विधान केले आहे ते असे म्हणतात की, "श्रीचक्रधर स्वामीच्या ठिकाणी अपूर्व वेदशक्ती होती या गोष्टीची जाणीवही त्यांना होती ती त्यांनी अनेक प्रसंगी स्वमुखाने बोलून दाखविली आहे" १ रामटेक येथील भोगरामाच्या देवळात ज्या ओट्यावर श्रीचक्रधर बसत त्या ओट्यावर केवळ बसल्यामुळेच एका ब्राह्मणाला सित्यानंद झाला होता. त्याला अनुलक्षूण स्वामी म्हणतात, "ऐसे है येथथिचेया नामापासौनी होय : का स्थानापासून होय :" ही प्रचीती बहुतेक भक्त मंडळीना आली होती.

ज्याकाळात श्रीचक्रधर संपूर्ण महाराष्ट्रात फिरले, वाईट परिस्थिती चा तो काळ होता, राजकीय सत्ता ही गटागटांमध्ये विभाजित होती. सामान्यांवर धर्माचा पगडा होता. जातीपातीच्या उतरंडी घट्ट झाल्या होत्या. “शुद्र जातीत जन्मलो हे आपलं पूर्वजन्मीचे पाप आहे आता यातून सुटका नाही,” असे बहुजनांना वाटत होतं. त्यांना ज्ञानाचे दरवाजे बंद होते. त्या काळात भगवद्गीता हा ज्ञानग्रंथ होता, तो संस्कृत भाषेत होता, परंपरेने चालत आलेलं धर्मशास्त्र, वेद उपनिषदे वाचण्याचा अधिकार सवर्णीयांना होता. बहुजनांना या ग्रंथाचा काही गंध नव्हता, त्यांना लिहिण्या वाचण्यापासून दूर ठेवण्यात आले होते. त्यामुळे ते अज्ञानी होते, शोषित होते. आपल्या मुक्तीचा विचार ते करू शकत नव्हते. त्यांच्या मुक्तीचा विचार सर्वज्ञ श्रीचक्रधरांनी केला, त्यांना सोप्या भाषेत दृष्टांताचा आधार घेऊन, स्वत्वाची ओळख

२. **सर्चिंग:** हमें अगर संगीत के विषय में संशोधन करना हो तो विक्किपीडिया के माध्यम से आवश्यक ग्रन्थ घर बैठे संगणक के माध्यम से मिला सकते है। इसकेअलावा बड़े बड़े ग्रंथालयों परविजिट किया जा सकता है। विसुअल ग्रंथालय को भी देखा जा सकता है । किताबो की सूची में से कोई भी किताब पढ़ी जा सकती है। संगीत प्रकार और संस्था की भी मालूमात घर बैठे प्राप्त कर सकते है।

३. **श्रवण:** एक काल ऐसा था घरानों का संगीत मर्यादित लोगो तक सीमित था, परन्तु आज संगणक द्वारा जगभर का संगीत एक छोटी से क्लिक के अन्त्राल्तक आया है। विविध कलाकारों के द्वारारागों की ध्वनिफीत, चित्रफीत वेबसाइट पर दाल कर रखी है। जैसेWWW.GOOGLE.COM; WWW.YAHOO.COM ; REDIFFMAIL.COM औरYOUTUBE.COMपर देखी और सुनी जा सकती है।अच्छा लगने पर उन्हें डाउनलोड किया जा सकता है। इतना ही नहीं एक-आध संगीत उत्सव प्रत्यक्ष सादरीकरणघर बैठे देखा जा सकता है।

४. **ई-लर्निंग:** अपने देश में शुरू से ही गुरु-शिष्य परंपरा थी। गुरु कीमर्जी के बिना ज्ञान की प्राप्ती नहीं हो सकती थी।परन्तु आज संगणक के द्वारा संगीत रूपी ज्ञान के अनेक दरवाजे खुल गये है। इसके लिए ई-लर्निंग एक लोकप्रिय एप्लीकेशन है। इससे से जगभर का कोई भी व्यक्ति संगीत का ज्ञान लेऔर दे सकता है।

५. **महफ़िल में ऑडियो और विडियो:**पहलेसंगीतकी ऑडियो और विडियो सम्पादन करने का काम फोटो ब्लेज़ और स्टूडियो का था, उदाहरण के लिए महफ़िल की चित्रीकरण करने का काम पूरा करने के लिए लैब की राह देखनी पड़ती थी। अभी संगणक से ऑडियो, विडियो, एडिटिंग,सॉफ्टवेरके माध्यम से खुद भी चित्रीकरण सम्पादन किया जा सकता है।

ऐसे कई सारे काम जैसे संगीतीक ग्रन्थ निर्मिती, वाद्यिकी निर्मिती, संगीत रिसर्च अकादिमी, ध्वनी की निर्मती इत्यादि काम संगणक के द्वारा किये जा सकते है। ये सब बदलाव एडिसन के काल से आधुनिक काल तक तन्त्रज्ञान में दिखाई देता है।

**निष्कर्ष:**

एडिसनकेसैंकड़ो शोधोमें संगीत का शोध भी बहुत अहम् भूमिका रखता है। उन्होंने संगीत प्रेमी लोगो को नई दिशा देने का काम किया है। उन्होंने फोनोग्राफ के माध्यम से संगीत का स्तर ऊँचा उठाया है। उन्होंने परिस्थिति के अनुसार नईनई संकल्पनाएं सामने लायी। विज्ञान के माध्यम से संगीत की प्रगति और उनका कार्य जग भूल नहीं सकता। आज के आधुनिक

युग में संगीत की प्रगति उनके शोधो में से निकलती दिखाई देती है। आज इन्टरनेट के माध्यम से हर प्रकार का संगीत घर बैठे प्राप्त किया जा सकताहै।

**सन्दर्भ ग्रन्थ सूची:**


१. डॉ. विनोद कुमार मिश्र, थोमस एडिसन अनुवाद डॉ0 मीरा घाडके , बिल्डर सोसाइटी, हीरोमतीअपार्टमेंट, नंदनवन कॉलोनी औरंगाबाद।

२. एडिसन तेज ज्ञान ग्लोबल फाउंडेशन, पिंपरी कॉलोनी, पोस्ट ऑफिस –बोक्स 25 पुणे, पिन- 411017, महाराष्ट्र, भारत

३. संगीत जगत-संगीत मासिक पत्रिका, नवम्बर- 1997, प्र0-100 ।

४. श्रीव्ही. के. किचलू, साक्षात्कार, 17-08-1996, कोलकाता

५. भारतीय संगीत में वैज्ञानिक उपकरणों का प्रयोग, अनीता गौतम, द्वितीय संस्करण, 2008, कनिष्क पब्लिशर्स डिस्ट्रीबटर नई दिल्ली।

६. ऍम. एस. सी.आई. टी.- टी. मोथी जे. ओ. लियरी लिंदो आयो लियरी, 2012.

# भारतीय शेतीपुढील आव्हाने

**प्रा.डॉ. राजेंद्र एन बोरसे**
प्राचार्य, भगवान बाबा महाविद्यालय, लोणार,जि. बुलडाणा लोणार

भारताच्या कृषिप्रधान अर्थव्यवस्थेत प्राथमिक क्षेत्राचे योगदान निश्चितच मोठे आहे , स्वतात्रोत्तर काळात औद्योगिक व सेवाक्षेत्रात मोठी प्रगती झाली परंतु शेतीचे क्षेत्र त्यापासून थोडे अलिप्त असल्याचे विद्यमान काळात दिसून येते. स्वातंत्र्यानंतर भारतात शेती विषयक सुधारणा भरपूर करण्यात आल्या ज्यात धरणे व कालव्यांची निर्मिती, सुधारित व संकरित बी-बियाणे , खते व कीटक नाशके, कृषी संशोधन संस्था , वेगवेगळ्या माध्यमातून कृषी सहाय्य व कर्ज माफी देण्यात आली, परतू शेती व शेतकरी यांच्यापुढील समस्या व नित्य नवी आव्हाने आजही कायम असल्याचे चित्र दिसते. हरितक्रांतीने देशात अन्नधान्याची स्वयंपूर्णतेकडे वाटचाल झाली हे तेवढेच खरे आहे.

१. **शेतजमिनीचे विभाजन व अपखंडन** : भारतीय शेती वंश परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असते त्यामुळे दिवसेंदिवस शेती आपल्याकडे असावी या या भावनेने विभक्त कुटुंबातील प्रत्येकाला शेतीचा काहीना काही हिस्सा हवा असतो त्यामुळे शेती लहान लहान तुकड्यात विभागली जाते व अशी शेतीचे आकारमान अतिशय लहान असल्यामुळे अश्या शेतीत आधुनिक सुधारणा शक्य होत नाहीत तसेच बांध संस्कृतीमुळे आगोदरच लहान असलेले शेतीचे क्षेत्र अधिकाधिक लहान होत जाते.

२. **हवामानातील बदल** : दिवसेंदिवस हवामानात कमालीचे बदल होत आहेत आणि ही ही परिस्थती शेती व शेतीपूरक उद्योग आणि इतर उद्योगधंदे यांच्यासाठी अतिशय बाधक ठरत आहे. हवामानातील बदलामुळे उश्नेतेत वाढ होणे , अवकाळी पाऊस , थंडीची लाट, तपमानातील वाढ व घट गारांचा पाऊस , चक्री वादळ, स्तुनामी यासारख्या आपत्ती उद्भवतात यातून शेतीचे मोठे नुकसान होते व हे हवामानातील बदल शेतीवर दीर्घकालीन परिणाम घडवुन आणतात , याचा परिणाम मोठे शेतकरी व सोबतच लहान शेतकरी यांचेसाठी नुकसानदायी असतात. याचा अंतिम परिणाम म्हणजे उत्पदानात घट होय , नुकत्याच ह्या हंगामात मार्च व एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात अवकाळी पाऊस सुरवातीस गहू , हरभरा ,व नंतरचे एप्रिलमध्ये द्राक्ष , संत्री, मोसंबी, आंबे, केळी, उस यासारख्या नगदी पिकांचे नुकसान झाले अश्या प्रसंगी सरकार कडून मदत दिली जाते परंतु ती अनेक निकषावर अवलंबून असते म्हणून मिळणारी मदत फार अल्प असल्याचे दिसून येते.

३. **कृषी मालाची आयात** : अंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातून जेव्हा देशात कृषी मालाची मोठी आयात केली जाते तेव्हा त्याचा देशातील शेतकरी उत्पादकांना मोठा फतक बसतो , भारतासारख्या लोकशाही राष्ट्रात लोकांची मर्जी सांभाळण्यासाठी व राष्ट्रहित जपताना देशात कृषी मालाच्या किमती वाढल्यास किमत वाढीची तीव्रता कमी करण्यासाठी आयात केली जाते परंतु विदेशी आयात कलेला माल बाजारात आणल्यास किमती कमी होतात, जागतिक व्यापार परिषदेतील करारानुसार सहभागी राष्ट्रांना विशिष्ट प्रमाणात आयात निर्यात बंधनकारक असते पण त्याचा फटका शेती उत्पादकांना बसतो. भारतात कांदा, सोयाबीन, गहू, साखर यांचे बाबतीत वेळोवेळी हा अनुभव येतो.

४. **वाढता उत्पादन खर्च** : दिवसेंदिवस वाद्गत जाणारा उत्पादन खर्च ही शेतकरी वर्गासाठी चिंतेचा विषय आहे , बियाणे, खते , कीटक नाशके , मजुरीचे दर , वाहतूक खर्च , साठवणूक खर्च या सर्व बाबींचा खर्च सतत वाढत आहे व त्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढून तुलनेत कृषी मालास मिळणारा भाव कमी असतो अश्यावेळी खर्च व उत्पनाशी सांगड घालणे कठिण होत आहे. लहान शेतकरी याचा सर्वात मोठा प्रभावित होणारा वर्ग आहे.

५. **शेतीसाठी सरकारकडून खर्चात कपात** : नुकत्याच केंद्र सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पात वरवर शेतकर्यांना खुश करण्याचा प्रयत्न केला असला तरी शेती व अनुशांघिक घटकांच्या तरतुदींना मोठ्या पप्रमाणात कात्री लावली आहे , गेल्यावर्षीच्या तुलनेत जवळपास २६ हजार कोटीच्या योजना कमी केल्या आहेत. राष्ट्रीय कृषी विकास योजना या महत्वपूर्ण योजनेतील ३१ टक्के रक्कम कापण्यात आली असून त्याचे परिणाम भविष्यात शेती व शेतकरी यांचेवर होणार यात शंका नाही. शेतकर्यांच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या राष्ट्रीय कृषी विकास योजनेची तरतूद ३१ टक्क्यांनी कमी केली आहे व ही योजना केंद्र

सरकारच्या मदतीने राज्य सरकार चालवीत असते. कृषी क्षेत्राचा विकासदर वाढविण्यासाठी ही योजना फायदेशीर ठरत असतानाच गेल्या वर्षीचे तुलनेत त्याचे ३२८३ कोटी रुपये कमी केले आहेत. एकीकडे शेतकऱ्यांसाठी आम्ही काहीतरी करीत आहोत असे भासविण्याचे काम केंद्र सरकारकरत असले तरी सरकारने कृषी खर्चाट कपात केल्याने त्याचा फटका शेत्क्र्यान्नाब्सणार यात शंका नाही.

सरकार द्वारे केलेल्या तुलनात्मक तरतुदी

| **योजनेचे नाव** | सन २०२२-२३ | सन २०२३-२४ |
|---|---|---|
| **प्रधानमंत्री पिक विमा** | १५५०० कोटी. | १३६२५ कोटी |
| **पीएम किसान योजना** | ६८००० कोटी. | ६०००० कोटी |
| **मनरेगा** | ७३००० कोटी | २७२३३ कोटी |
| **राष्ट्रीय कृषी विकास** | १०४३३ कोटी | ७१५० कोटी |
| **कृषीन्नोती** | ७१८३ कोटी | ७०६६ कोटी |

वरील ५ महत्वाच्या योजनांच्या खर्चात कपात झाल्यामुळे शेतीपुढे भविष्यात मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

**संदर्भ :**

१.ब्रम्हे सुलभा (२०१२) “शेतकरी जात्यात“ एरंडवने प्रकाशन , सोलापूर.
२.मगर डी.बी. ( २०१८) “भारतीय अर्थव्यवस्था“ रत्नी प्रकाश सोलापूर.
३. लोकसत्ता , तरुण भारत , महाराष्ट्र टाइम्स, इ. वर्तमान पत्रे.
४ . लोकमत (अकोला )दिनांक ८ फेब्रुवारी २०२३.
४. वैद्य एन.बी. (२००३) “विदर्भाची अर्थव्यवस्था“, मंगेश प्रकाशन, नागपूर.

# सांप्रत काळात संत तुकारामांच्या अभंगातील विचारांची उपयुक्तता

**नेमीचंद एफ. चव्हाण**
सहयोगी प्राध्यापक, सुधाकरराव नाईक महाविद्यालय, अकोला
nfchavhan@gmail.com

भागवत धर्माची कळस बनलेले संत तुकाराम म्हणजे विचारापेक्षा शाश्वत मानवी मूल्यांची निष्ठा समाजात सतत पेरण्यासाठी धडपडत राहणारी महान विभूती. तुकोबांच्या अभंगाचा साधा स्पर्शही ज्याला झाला नसेल अशी व्यक्ती शोधूनही उभ्या महाराष्ट्रात सापडणार नाही. म्हणूनच तुकोबांचे अभंग हे सार्वकालिक, सार्वत्रिक आणि सार्वजनिक स्वरूपाचे आहे. तुकोबा हा पहिला मराठी माणूस आहे की, ज्यांच्या अभंगाचा अनुवाद विदेशी भाषांमध्ये सर्वप्रथम झाला आहे.

महाराष्ट्राला जी संतपरंपरा लाभलेली आहे, त्या संताच्या चळवीच्या ध्येयाविषयी अनेक अभ्यासकांनी साधक-बाधक विचार मांडले आहे. त्यापैकी ग.बा. सरदारांनी असे म्हटले आहे की, "संताची चळवळ फक्त धर्मसुधारणेचे कार्य करीत होती, समाज सुधारणा हे संतांच्या चळवळीचे ध्येय नव्हते. त्यांना धार्मिक जीवनातच समता आणावयाची होती" किंवा काही अभ्यासक असेही म्हणतात की, संत वाड्.मय हे जीवनपराड्.मुख व नैराश्यवादी आहे, देशाचे सामर्थ्य खच्ची करणारे आहे. एकेकाळी ते समाजाला उपयुक्त असेल पण आधुनिक काळात त्याची उपयुक्तता संपुष्टात आली, किंवा संतांनी, त्यांच्या साहित्यानी समाजाला नेभळट किंवा निष्क्रिय बनविले." परंतु ल.रा. नसिराबादकर, बा.सी. बेन्द्रे, ह.श्री. शेणोलीकर, भालचंद्र नेमोडे, दि.पू. चित्रे सारख्या अभ्यासकांनी तुकोबांच्या धार्मिक आणि सामाजिक अशा दोन्ही कार्याचा गौरव केलेला आहे. "संत तुकाराम" हया आपल्या ग्रंथात बा.सी. बेन्द्रे म्हणतात- "तुकोबानी पराप्राप्तीच्या साधनमार्गात संन्याश, वैराग्य, विषयवासना ज्या काही मूलत:च अनिष्ट समजूती रुढ होऊन बसल्या होत्या, त्यात मोठीच क्रांती घडवून आणली यात शंका नाही." हट्टाग्रही, सनातनी, अहंकारी पंडीत, दांभिक समाजकंटक यांची बिंगे बाहेर काढून त्याना जरब बसवणारी मर्मभेदक टीका तुकोबांनी केली आहे. त्यांच्या अभंगावरुन लोकव्यवहाराचे बारीक निरीक्षण, मनुष्य स्वभावाचे सूक्ष्मज्ञान, जबरदस्त आत्मविश्वास, तडफदारवृत्ती हे निष्ठावंत समाजसुधारकांचे गुणविशेष तुकारामांच्या ठिकाणी होते, यांची खात्री पटते." अशाप्रकारे संत साहित्याच्या गाढे अभ्यासकांमध्ये मतभेद दिसते. खरे पाहिले तर, तुकारामाला किंवा त्यांच्या अभंगवाणीला समजून घेण्याची कुवत किंवा लायकी आपल्यामध्ये नाही, कारण ते 'संत' आहेत. तुकोबाला समजून घ्यायचे असेल तर ते बुध्दीने नव्हे तर ह्रदयानीच समजून घ्यावे लागते.

तुकोबा हे कृतीशील समाजसुधारक होते. सर्वप्रथम त्यानी 'स्वत:' ला बदलून घेतले, नंतर आपल्या जवळील शब्दरुपी शस्त्राने 'दे दणका' किंवा 'हल्लाबोल' करुन समाजातील अपप्रवृत्ती, समाजातील प्रदूषित झालेले वातावरण, समाजात निर्माण झालेली बजबजपूरी नष्ट करण्याचा प्रयत्न केला. आपल्या अभंगाद्वारे मनुष्याला दिलेली शिकवण ही वांझोटी किंवा कोरडी नव्हती. समाजाला सदाचाराची शिकवण देणारे ते लोकप्रिय लोकशिक्षक किंवा समाजशिक्षक होते. आपले संपूर्ण आयुष्य केवळ मानवजातीच्या कल्याणासाठी तुकोबांनी समर्पित केले. तुकोबांच्या अभंगाची उपयुक्तता समाजाभिमुख असून देशाच्या उत्थानासाठी व समाजाच्या शुध्दीकरणासाठी त्यानी काळानुरुप प्रयत्न केलेला आहे, आणि भविष्यातही करत राहणार आहे.

सांप्रत युग हे संगणक युग म्हणून ओळखल्या जाते. या वैज्ञानिक युगात सर्वच क्षेत्रात मानवाने कितीही नेत्रदीपक प्रगती केलेली असली तरी समाजजीवन सुखी, समाधानी, व सफल झाले असे मात्र निश्चितपणे आपल्याला सांगता येणार नाही. आज संपूर्ण जगात विज्ञानाचाच प्रभाव सर्वत्र दिसून येत असला तरी त्यामुळे समाजजीवनाचा उत्कर्ष होण्याऐवजी ते उध्वस्त होताना दिसत आहे. यांचे मुख्य कारण म्हणजे समाजजीवनात एकीकडे भोगवादी, जडवादी, नास्तीक्यबुध्दीचे आणि नीती-अनीती व पाप-पुण्य यांचा विचार न करण्याच्या प्रवृत्तीचे बनले आहे. व दुसरीकडे संपूर्ण भारतीय समाज हा चैतन्यहिन बनलेला आहे. अशा मरगळलेल्या स्थितीत न्याय, नीती, सत्य, सदाचार, सेवा इ. मानवी जीवनमूल्ये समाजातून नष्ट होत आहे. आजचा हा समाज त्यागापेक्षा भोगामध्ये लीन झालेला आहे, आपल्या

कर्तव्यकर्माची जाणीव विसरलेला आहे, वेगवेगळया व्यसनांच्या आहारी जाऊन भरकटलेला आहे, रुढी परंपराच्या प्रवाहात गटांगळया खात आहे, अंधश्रध्देच्या चिखलात पडून मलीन झालेला आहे, कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही. उच्चशिक्षित मंदिरात दर्शनासाठी लाच देतो आहे, इच्छीत ध्येय पुर्ण झाले की नवस फेडण्यासाठी कोंबडया-बकऱ्यांचा बळी देतो आहे. **"देखत हा जीव हुंबरे वरडत। निष्ठूरांचे हात वाहाती कैसा।।"** या मुक्या पशु पक्ष्यांनाही जीव असतो हे विसरला आहे. सत्तापिपासू प्रवृत्ती भ्रष्टाचाराला खत पाणी देत दीन दुबळयांना गिळंकृत करण्याचा पाशवी प्रयत्न करीत आहे. कृषीप्रधान देशामध्ये बळीराजा आत्महत्या करतो आहे. सांगायचे तात्पर्य हेच की, संपूर्ण समाज हा अध:तपनाच्या खोल खाईत आपटण्याच्या अवस्थेत आहे. म्हणून आजच्या समाजातील प्रदुषित झालेले वातावरण, निर्माण झालेली बजबजपूरी, भ्रष्टाचार, अंधश्रध्दा, दुराचार जर नष्ट करायचे असेल तर तुकोबांच्या अभंगवाणीचा रोखठोकपणाच उपयुक्त ठरेल. आजची ही जी सामाजिक परिस्थिती आहे. त्यापेक्षाही भयंकर अशी वाईट परिस्थिती तुकाबांच्या काळात होती. **"भले तरी देऊ कासेची लंगोटी। नाठाळाचे माथा हाणू काठी।।"** **किंवा "कठीण वज्रास भेदू"** असा रोखठोकपणाचा निर्माण करुन त्यावेळच्या परंपरावादी धर्मपंडीतांना एकप्रकारे आवाहण केले. आज आपल्याला राज्यघटणेनी अनेक मुलभूत अधिकार दिलेले आहे. आपण कुठलाही धर्म स्वीकारु शकतो, किंवा कुठल्याही जाती-धर्मावर बोलू शकतो. पण तुकोबांसारख्या शुद्र कुळात जन्मलेल्यांना त्या काळात कुठलाच अधिकार नव्हता. तरीही त्या धर्मपंडीताचा, टवाळखोरांचा त्रास, छळ सहन करुनही त्यानी रोखठोकपणा स्वीकारलेला होता. आणि **"न देखवे डोळा ऐसा हा आकान्त परपीडे। चित्त दु:खी होते"**।। असे म्हणत आपल्या अवतार कार्याचे प्रयोजन स्पष्ट केले. **"धर्माचे पालन। करणे पाखंड खंडन"**।। असे म्हणून आपल्या साध्या सोप्या शब्दातून ब्राम्हणांची पाखंडता समाजासमोर मांडून संपूर्ण महाराष्ट्राला यवनांच्या तावडीतून व बहुजन समाजाला ब्राम्हणांच्या धार्मिक मानसिक गुलामगिरीत खितपत पडलेल्या समाजाला नवचैतन्य दिले. तत्कालीन महाराष्ट्राच्या धार्मिक व सामाजिक जीवणात आमूलाग्र क्रांती घडविण्यात तुकोबांचा सिंहाचा वाटा आहे. सर्व प्राणीमात्र ही एकाच परमेश्वरांची लेकरे आहेत, म्हणून गुण्यागोविंदाने एकत्र नांदून समाजात परस्पर प्रेमाचे व सहकार्याचे वातावरण निर्माण व्हावे, प्रत्येक गाव व व्यक्ती स्वावलंबी बनून राष्ट्राचे व समाजाचे भवितव्य उज्वल व्हावे, अशा नवसमाज निर्मितीचे स्वप्न तुकोबांचे होते आणि हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तुकोबांनी समाजात डोळसपणा आणला, काळाचा प्रवाह ओळखून परिस्थितीच्या मर्यादा जाणल्या, सामाजिक, धार्मिक, राजकिय परिस्थितीचा अभ्यास करुन समाज जीवनाला पोषक असा आदर्श मार्ग दाखवला. तुकोबा आपल्या अभंगवाणीने जर सतराव्या शतकात सामाजिक, धार्मिक क्रांती घडवून आणू शकतात तर आधुनिक काळातही सामाजिक स्तरांवर तुकोबांच्या अभंगवाणीची उपयुक्तता सिध्द होऊ शकते, हे निर्विवादपणे सांगता येईल. भावी काळाची चाहूल लक्षात घेऊनच तुकोबांनी समाजासाठी उदबोधक असे विचार मांडले आहे. जोपर्यंत पंढरपूरचा विठ्ठल आपल्या रखूमाईसह विटेवर उभा आहे तोपर्यंत 'पंढरीची वारी' व वारकऱ्यांची पताका फडकतच राहणार आहे. **"ज्ञानदेव-तुकाराम, नामदेव-तुकाराम"** हा गजर युगानुयुगे कायम राहणार आहे आणि असे चित्र एकविसाच्या शतकातही दिसत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'लोकशाही म्हणजे समानता अशी एका वाक्यात लोकशाहीची व्याख्या सांगितली आहे. परंतु या समानतेचा पुरस्कार तुकोबांनी ३५० वर्षापूर्वी केलेला दिसून येतो. मनुष्याचा मोठेपणा त्यांच्या जातीवरुन ठरत नाही, तर त्यांच्या ठायी असणाऱ्या गुणावरुन ठरत असतो, असे तुकोबांचे स्पष्ट मत होते. दुष्ट प्रवृत्तीचा मनुष्य केवळ उच्चकुळात जन्मला म्हणून तो श्रेष्ठ होऊ शकत नाही, म्हणजेच वर्णाने, जातीने किंवा जन्माने येणारे उच्चनिचत्व आणि त्यावर आधारलेली विषमता, अस्पृश्यता तुकोबांना मुळीच मान्य नव्हती. ते मूलभूत एकतेचे व समतेचे पुरस्कर्ते होते, **"यारे यारे लहान थोर। याती भलते नारी नर।।"** असा उद्घोष करुन त्यानी विठ्ठलांच्या ध्वजाखाली सर्वांना एकत्र आणले. **"जातीचा सिंदळी। तिला कोण वंशावळी।।" किंवा "अधमाची जातीच अधम"** , अधमाची जात अन्य असूच शकत नाही. दुर्जन तो महार असो, मांग असो वा ब्राम्हण असो त्यांची एकच. 'दुराचारी तो चांडाळ' असे ते म्हणतात. अशाप्रकारे तुकोबांनी जन्माधिष्ठित उच्चनिच्चतेच्या विकृत कल्पनेचे समाजातून समूळ उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला. तुकाबांच्या या प्रयत्नामुळेच हिंदुच्या एक्याचे विचार पंढरपूर येथून महाराष्ट्रभर जोराने वाहू लागले. त्याचा परिणाम

म्हणून स्वराज्य स्थापनेत झाला. लोकांची एकता पाहून तुकोबानी आपल्या कीर्तनातून राष्ट्रासाठी शीर तळहातावर घेऊन लढण्याची प्रेरणा दिली. **"पाईक तो प्रजा राखोनिया कुळा। पारखिया मूळ छेदी दुष्टा।।" किंवा "येता गोळयां बाण साहिले भडिमार। कर्बता अपारदुष्टी वरी।।"** अशा तुकोबांच्या मेघगर्जनेने पुणे प्रांताच्या दऱ्याखोऱ्यात शिवबाना मावळे मिळाले. हिंदुस्थानातील कोणत्याही प्रांतास जे करता आले नाही ते फक्त महाराष्ट्राने करुन दाखवले. त्या काळात महाराष्ट्रीयन समाजाध्ये तुकोबांनी जी वीरवृत्ती निर्माण केली त्या वीरवृत्तीमुळेच पुढच्या काळातही संपूर्ण हिंदुस्थान ताब्यात घेतल्यानंतरच इंग्रजांनी महाराष्ट्रात हात-पाय पसरवले. अशाप्रकारे नैराश्य रोगाने जर्जर झालेल्या समाजता तुकोबांनी नवचैतन्य निर्माण केले. हे महान कार्य करतांना त्यानी जातीव्यवस्था व वर्णव्यवस्थाकडे लक्ष दिले नाही. **"युध्द करावया सामर्थ्य आणावे। तरीच म्हणावे क्षत्रिय त्यासी।।"** जो युध्दावर जाईल, शौर्य गाजवून पराक्रम करेल तोच क्षत्रिय तेथे जातीची आडकाठी नाही, या तत्वाचा त्यानी पुरस्कार केला. अशाप्रकारची नवी परिभाषा सर्वप्रथम तयार करुन समाजामध्ये देशभक्तीची व शुरवृत्तीची प्रेरणा निर्माण केली.

तुकोबानी शेतीच्या व्यवसायातही चोख वर्तन आवश्यक आहे हे आपल्या अभंगातून स्पष्ट केले आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टिने 'पेरणी' ही अतिशह महत्वाची असते म्हणून ते शेतकऱ्यांना संदेश देताना म्हणतात- **"मढे झाकुनिया करिती पेरणी। कुणाबियाची वाणी लवलाही।।"** परिश्रम, सतर्कता व वेळीच काम करण्याची हातोटी या तीन गोष्टी शेतीच्या बाबतीत फार महत्वाच्या आहेत. **"वोणव्या सोंकरी। सेत खाल्ले पाखरी।।"** म्हणून ते पिकांचे संरक्षण करण्यास सावध राहण्याचा सल्ला देतात. निसर्ग, बाजारपेठा, आयात-निर्यातीचे सरकारी धोरण, सावकारी पाश, अज्ञान, अंधश्रध्दा, शेती करण्याची चुकीची पध्दत, व्यसन, शासनाचे दुर्लक्ष अशा अनेक कारणांमुळे पुरोगामी महाराष्ट्रातील बळीराजा आत्महत्या करतो आहे. अशा शेतकऱ्यांना निश्चितच तुकोबांचा सल्ला उपयुक्त ठरेल. मृत्यूला कवटाळणाऱ्या बळीराजांना मानसिक बळ पुरवण्याची ताकद तुकोबांच्या अभंगवाणीत निश्चितच आहे.

ज्याप्रमाणे शिष्य आपल्या गुरुला आपला देव मानतो त्याप्रमाणेच गुरुचे आचरण सुध्दा देवासारखेच असायला पाहिजे. 'गुरुत्व' हे धनप्राप्तीचे साधन असू नये अशी तुकोबानी शिकवण दिली आहे. परंतु आज शिक्षणाचे बाजारीकरण झालेले आहे. तसेच आजच्या शिक्षणातून केवळ 'माहिती' मिळते. तुकोबांच्या मते- ज्या शिक्षणातून संस्कार मिळते ते खरे शिक्षण होय.' आज हजारो रुपयांची थैली घेऊन विद्यादान करतांना 'गुरुजी' दिसतो आहे. गुरु-शिष्यांच्या पवित्र नात्यांमध्ये विश्वास राहिलेला नाही. वासनांध शिक्षक आपल्या शिष्येवर बलात्कार करतांना दिसतो आहे. त्यामुळे अशा भरकटलेल्या गुरुनाही दिशा दाखवण्याचा प्रयत्न तुकोबानी आपल्या अभंगाद्वारे केलेला आहे. **"जळो जळो ते गुरुपण। जळो जळो ते चेलेपण।।" आणि "गुरु आला वेशीद्वारी। शिष्य पळतो खिंडोरी।।"**

तसेच आपल्या समाजामध्ये कीर्तन करणारे, देवांची कथा करणारे, भागवत सप्ताह करणारे जे ढोंगी, मिरवणारे ह.भ.प. आचार्य असतात ते लाखो रुपये घेऊन फक्त पोपटपंची करतात आणि मनामध्ये असंख्य लोभाची इच्छा ठेवतात. **"कथा करितो देवांची। अंतरी आशा बहुलोभाची।।"** म्हणून तुकोबा मम्हणतात की, कीर्तनकाराने समाजात शुध्द आचरण ठेवावे. पैसा घेऊन कीर्तन करु नये. माथी टीळा लावू नये, कीर्तनाच्या जागी अन्न घेऊ नये, कीर्तन हा पोटापाण्याचा धंदा करु नये तर कीर्तनाद्वारे समाजाला ज्ञान देण्याचे कार्य करावे, अशी निखळ आणि शुध्द आचरणाची शिकवण दिली. परंतु आज हया पोटभरु, पाखंडी संताचा हा गोरखधंदा झालेला आहे. **"अंगा लावुनिया राख। डोळे झाकुनि करिति पाप।।"** प्रवचन झाल्यानंतर हे संत स्त्रियांचा भोग घेतात. अशाप्रकारे तुकोबानी रुढसंकेताच्या, दांभिकपणाच्या आणि अंदश्रध्देच्या विध्वंसाने प्रथम समाजाची मनोभूमी नांगरुन तिच्यात प्रांजळ भक्तिभाव, नीती आणि समाज उध्दाराचे विधायक बी पेरले आहे.

समाजगंगेचा शुध्द प्रवाह गढूळ करणाऱ्या दूर्जनांचा आणि मानवी जीवनाला पोखरुन काढणाऱ्या दुर्व्यसनांचा अत्यंत कडक शब्दात तुकोबांनी निषेध केलेला आहे. 'परित्राणाय साधुनां विनाशायच दुष्कृताय' या गीतेतील तत्वांचे अनुसरण करुन समाज घडविला. **"गाढव शृंगारिले कोडे। काही केल्या नव्हे घोडे।।"** दुर्जनावर कितीही सुसंस्कार केले तरी त्यांच्यात सुधारणा होऊच शकत नाही. म्हणून अशा लोकांना उपदेश देण्याच्या भानगडीत पडू नये असे तुकोबा सांगतात. समाज विघातक गोष्टी करण्यातच ते परमानंद मानतात. कनक आणि कांताच्या आसक्तीपायी अनेक लोकांचे संसार धुळीस मिळालेली आहे. सांसारिक जीवनाच्या दृष्टीने स्त्री व संपत्ती आवश्यक असल्यातरी त्यांची आसक्ती तुकोबानी वर्ज्य

मानली आहे. नैतीक चारित्र शुध्द असल्याशिवाय कोणताही समाज किंवा राष्ट्र प्रगती करु शकत नाही हे परस्त्रीला रखूमाई प्रमाणे मानणाऱ्या तुकोबांनी जाणले होते. **"तुका म्हणे पतिव्रता। तिची देववरी सत्ता।।"** पतीव्रता स्त्री व माता या स्त्रियांच्या दोन भूमिका संबंधी त्यानी अतिशय गौरव केला आहे. तत्कालीन समाजाची अध:पतीत अवस्था तुकोबानी उघडया डोळयांनी बघितलेली होती म्हणूनच त्यानी विषय-वासनेवर विशेष भर दिला आहे. **"इंद्रियाचा जय साधुनिया मन। निर्विषय कारण असे तेथे।।"** तेंव्हा वेगवेगळया विषयांकडे वारंवार धावणाऱ्या मनावर किंवा इंद्रियावर विजय मिळवणे हाच खरा पुरुषार्थ आहे असे ते म्हणतात. आज मनुष्य हा एवढा विषयासक्त झालेला आहे, की अशा वासनांध पुरुषांना किंवा स्त्रियांना तुकोबांची वाणीच नैतीकतेची शिकवण देऊ शकते. **"श्वानाचिये परी हिंडे दारोदारी। पाहे परनारी पापदृष्टी।।"** असे कुत्रयांसारखे दारोदार हिंडणारे व परस्त्रीकडे पापी नजरेणे बघणारे तुकोबांच्या काळातही होते, आजही आहे आणि भविष्यातही यांची संख्या भरपूर राहणार आहे. म्हणूनच परस्त्रीला 'माता' मानण्याचा उपदेश तुकोबांनी वारंवार करुन समाजशुध्दीकरणाचे महत्वाचे कार्य केले आहे. स्त्रीने देखिल आपल्याच पतीशी एकनिष्ठ असावे, अशा प्रकारचा उपदेश करुन सुखी संसाराचा मार्ग दाखविला. विशेषत: स्त्रीचे कुटुंबातील स्थान हे अत्यंत महत्वाचे असते. तिच्या विचाराचे घरातील लहान मुलांवर संस्कार होत असतात. म्हणूनच स्त्रियांना उपदेश करतांना तुकोबा म्हणतात- स्त्रीने पतिव्रता धर्माने चालावे, आपले शील सांभाळावे, धर्मकार्यात पतीला अनुकूल वागावे, गृहकृत्ये नीट करावी, तुळशीची, गाईची पूजा करावी. पाहुण्यांचे आदर सत्कार करावे, मुलांना संस्कारमय शिक्षण द्यावे.

आज समाजातून संयुक्त कुटुंबपध्दती पूर्णपणे नष्ट होताना दिसत आहे. **"वेगळे निघता संसार करीन। नाही तरी प्राण देत आता।।"** अशाप्रकारे सासरच्या लोकांविरुध्द नवऱ्याने कान भरुन कुटुंबातून वेगळे व्हायला सांगणाऱ्या बाईवर तुकोबानी ताशेरे ओढले आहे. त्याचप्रमाणे बाईलवेडया नवऱ्याचेही वाभाडे काढले आहे. बायकोंच्या बोटावर नाचणाऱ्या आणि "सकाळी उठोन वेगळा निघेन" असे बायकोला शब्द देणाऱ्या व बायकोंच्या नातेवाईकांना आवडीने जवळ करणाऱ्या पण जन्मदात्या आईबापांना घराबाहेर घालवून देणाऱ्या बाईलवेडयांच्या **"तुका म्हणे केला रांडेने गाढव। मनासवे धाव घेतसे।।"** म्हणून तुकोबांनी आदर्श गृहस्थाश्रमासाठी आणि जीवनात सुख, शांती समाधान व साफल्य मिळवण्यासाठी संसारीकाना **"जोडोनिया धन उत्तम वेव्हारे। उदास विचारे वेच करी।।"** यासारख्या शेकडो अभंगातून उपदेश दिलेला आहे.

आज समाजात धडधाकड लोक कष्ट करण्याचे जीवावर येत असल्याने भीक मागत दारोदार फिरत राहतात. अशाना भिक्षा, दान देणे म्हणजे त्यांच्या ऐदीपणाला प्रोत्साहन देणेच होय. म्हणून दान हा धर्म असला तरी तो सत्पात्री असावा. धर्मांधतेच्या त्याही काळी तुकोबांच्या दानधर्माविषयीचा प्रस्तुत विचार किती डोळसपणाचा होता यांची स्पष्ट जाणीव होते. **"धन्य म्हणवीन येह लोकी लोका। भाग्य आम्ही तुका देखियेला"**।। खरोखरच, प्रत्येक काळातील मनुष्य हा भाग्यवान आहे. कारण प्रत्येक काळात तुकोबांच्या अभंगवाणीनी समाजाला जीवनसत्व पुरविले आहे. हजारो वर्षापासून जसा चारही वेदांचा महिमा समाजमनावर दिसतो आहे, तसाच या पाचवा वेदांचा (तुकारामांची अभंग गाथा) ही महिमा समाजमनावर राहणार आहे. जोपर्यंत मराठी भाषा जिवंत आहे. तोपर्यंत 'तुकोबांची अभंगवाणी' अभंग राहणार नाही. "तुकोबांची अभंगवाणी हे असे गुणकारी औषध आहे की त्या औषधांची Exp. Date अजूनही संपलेली नाही. हे औषध जसजशे जुने होत जाईल तसतशे औषधी गुणधर्म वाढत राहणार आहे." तुकारामांच्या अभंगात धर्महिताचा गाभा असून समाजहिताचा जिवंत जिव्हाळा आहे. त्यांची अभंगवाणी ही हिंदुधर्माचे सारसर्वस्व आहे. धर्म, समाज व राष्ट्र यांच्या सुधारणेचा तिच्यात सर्वांगीण विचार केलेला आहे. सत्यदृष्टीचा चष्मा लावून त्यांच्या अभंगभांडारात कोणीही शिरल्यास त्याला स्पष्टपणे हेच दिसेल की, तुकोबांनी त्या पडत्या काळीही महाराष्ट्रास स्वधर्म व स्वकर्तव्य याची खरी जाणीव करुन दिली आहे.

**संदर्भ ग्रंथ:**


1. सुबोध श्रीतुकाराम गाथा, आवृत्ती-१७ फेब्रु. २००८
2. संताचे साहित्य व कार्य, संपा. प्रा. प्रवीण घारपूरे, आकार प्रकाशन, नागपूर प्र.आ. ४ डिसें. २०१७

# मराठी संतांच्या विचारांची उपयुक्तता

**प्रा. डॉ. विनोद नामदेव इंगळे**
ग.भि.मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय, शेगांव.

महाराष्ट्र ही संतांच्या विचाराने भक्कम झालेली भूमी आहे. या भूमिमध्ये अनेक संत महात्म्यांच्या संस्कारांच्या पाऊलखुणा जागजागी उमटलेल्या दिसून येतात. उदाहरणच घ्यायचं झाल्यास आपणास थेट १२ व्या शतकापासून ते संत गाडगेबाबा पर्यंत घेता येईल. यामध्ये संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत कान्होपात्रा, संत सावतामाळी, संत गोरा कुंभार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा इत्यादी अनेक संतांचे दाखले आपणास सहज घेता येतील. वेगवेगळया जाती धर्मातून आलेल्या संतांच्या संस्कारांमध्ये समग्र समाजातील लोकांना एकत्र आणण्याचे सामर्थ्य होते. बाराव्या शतकातील परिस्थिती लक्षात घेतली, तर आपणास असे दिसून येते की, सर्वमान्य माणसांना स्वतःच्या विवंचने मधून मुक्त करणे आणि त्यांच्या जीवनातील खऱ्या सौंदर्याची त्यांना जाणीव करून देणे, हे सर्वात महत्त्वाचे तत्व तत्कालीन कालखंडाचे असलेले आपणास पाहायला मिळते. जो कालखंड स्वकर्तृत्व आणि परिश्रमाने मोठे झालेल्या संत महंतांना छळत होता त्या कालखंडामध्ये सर्वसामान्य माणसांची काय अवस्था असेल हे वेगळे सांगण्याची गरज पडत नाही. च्या कालखंडामध्ये सर्वसामान्य माणसांना एक वेगळा आधार देण्याचे काम संतांनी आपल्या विचारांच्या, अभंगांच्या, भारुडांच्या माध्यमातून केलं. हे महत्त्वाचं. वारकरी संप्रदायाचा विचार करीत असताना त्यामध्ये संत ज्ञानेश्वरांचा आग्रहाने विचार करावा लागतो. संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' हा मराठी साहित्यालाच नव्हे तर अखंड विश्वाला दिलेला महान ग्रंथ होय. प्रत्येक कालखंड ज्ञानेश्वरीच्या रूपाने समृद्ध झालेला आपणास आजही पाहायला मिळतो. त्याचे नवेपण प्रत्येक कालखंडामध्ये स्पष्टपणे जाणवते. एकप्रकारे आपणास असे म्हणता येईल की, प्रत्येक पिढी हा संस्काराचा ठेवा दुसऱ्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा इमाने इतबारे प्रयत्न करताना दिसून येते. एक प्रकारे प्रत्येक माणसाकडून ही सहज घडणारी प्रक्रिया आहे. कोणताही कालखंड हा निकोप होता असे आपणास ठामपणे म्हणता येणार नाही. त्याच्या म्हणून काही समस्या, काही अडचणी, काही प्रश्न होते त्या त्या प्रश्नांना सोडवण्यासाठी प्रत्येक माणूस धडपडत होता. परंतु त्याच्या प्रयत्नांना यश मिळत होतेच असे नाही. तरी त्याची धडपड सुरू होती. या सर्व सामान्य माणसांच्या या धडपडीला त्यांच्या ध्येयापर्यंत नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संतांनी केलं, ते आपल्या विचारांच्या माध्यमातून. 'पसायदान' त्याचे उत्तम उदाहरण आहे. ' आता विश्वात्मके देवे, येणे वाग्यज्ञे तोषावे, तोशोनी मज द्यावे, पसायदान हे, जे खळांची व्यंकटी सांडो तया सत्कर्मी रती वाढो, भुता परस्परे जडो मैत्र जीवाचे, दुरितांचे तिमिर जावो विश्व स्वधर्म सूर्य पाहो, जो जे वांशील तो ते लाहो प्राणीजात ' संत ज्ञानेश्वरांचा ' विचार हा महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून अखिल विश्वाचा विचार करतो. एकंदरीत सर्व मानव समूहाला आनंदाने जीवन जगता यावे, यासाठी संतांनी प्रसंगी स्वतःच्या संसाराकडे दुर्लक्ष करून इतरांचे संसार संपन्न करण्याचा प्रयत्न केला.

संत ज्ञानेश्वरांच्या बरोबरीने संत परंपरेमध्ये सर्वात महत्त्वाचे नाव जर कोणत्या संताचे घेतले जात असेल तर, ते संत नामदेव यांचे. संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वर समकालीन होते त्यामुळे त्यांच्या समोर असणारा समाज, त्या समाजाची सामाजिक, आर्थिक, राजकीय सांस्कृतिक,परिस्थिती सारखीच होती. याची जाणीव संतांना होती. त्यामुळे संतांना माणसांच्या मनापर्यंत थेट जाता आले व त्यांचे मन उलगडता आले. संत नामदेवांनी भागवत धर्माची पताका थेट पंजाबपर्यंत नेऊन पोहोचवली. संत नामदेवांना ८० वर्षाचे आयुष्य लाभले. या आयुष्यामध्ये त्यांनी सातत्याने भागवत धर्माचा प्रसार आणि प्रचार केला. सर्वसामान्य माणसांना एका क्षत्राखाली आणण्याचा प्रयत्न संत नामदेवांनी केला. कुणाच्याही मनामध्ये आप परभाव राहू नये, श्रेष्ठ कनिष्ठत्व राहू नये, यासाठी संत नामदेव आपल्या अभंगांच्या माध्यमातून सामान्य माणसांपर्यंत गेले. त्याला समजून घेण्याचा प्रयत्न केला. संत नामदेव हे गृहस्थाश्रमी होते. त्यामुळे गृहस्थी जीवन जगणाऱ्या माणसांच्या संवेदना आपल्या अभंगांमध्ये नेमक्या टिपण्याचा प्रयत्न संत नामदेवांनी केला. संत नामदेवांचे अभंगांचा विचार करीत असताना जीवनाचे वास्तव चित्र ते मांडताना आपल्याला दिसतात. त्यासाठीची त्यांची धडपड

कमालीची आहे. माणसाच्या जन्मात आल्यानंतर काहीतरी चांगले करून गेलो पाहिजे ही ही तळमळ त्यांची जागजागी दिसून येते. 'शेवटिली पाळी तेव्हा मनुष्यजन्म, चुकलीया वर्म फेरा पडे, एक जन्मी ओळखी करा आत्मारामा, संसार सुगम भोगू नका, संसारी असावे असुनी नसावे कीर्तन करावे वेळोवेळा, नामा म्हणे विठो भक्ताचीये द्वारी, घेऊनींया करी सुदर्शन ' सर्वसामान्य माणसांना स्वतःचा उद्धार करून घेण्याचा एक साधा आणि सरळ सोपा मार्ग संत नामदेवांनी वरील उक्तींच्या माध्यमातून स्पष्ट केलेला आहे. वैषयिक आनंद हा सर्व सामान्य माणसाचा सर्वात महत्त्वाचा दुखता भाग असतो. त्यामध्ये रमत जाने हे त्याला महत्त्वाचे वाटत असते. आणि नेमके यामधूनच त्याला दूर करून, जीवनाचं खरं सौंदर्य दाखवण्याचे काम संस्कारांच्या माध्यमातून होत आलेलं आहे.

संत परंपरेतील दुसरे महत्त्वाचे संत म्हणजे संत तुकाराम हे आहेत. संत तुकाराम हे सतराव्या शतकातील एक महत्त्वाचे वारकरी संत होते त्यांचा जन्म देहू या गावामध्ये झाला. त्यांनी सर्व सामान्य माणसांना ईश्वर भक्तीचा सुगम मार्ग दाखविला. असे असले तरी संत तुकाराम हे वास्तवादी, समाजातील दंभावर रोखठोकपणे प्रहार करणारे संत होते. सर्वसामान्य माणसाचे होणारे आर्थिक आणि शारीरिक शोषण त्यांनी त्यांच्या काव्याचा विषय होतो. आपल्या समाजामध्ये निर्माण झालेली विषमता आणि त्यामुळे पोळला जाणारा सर्वसामान्य माणूस संत तुकारामांचे चिंतनाचा विषय होता. त्यामुळे तुकारामाचे अभंग हे प्रसंगी मृदू आणि प्रसंगी कठोर होताना आपल्याला पाहायला मिळतात. एक अभ्यासाक या नात्याने आपण संत तुकारामांच्या अभंगांचे विचार करीत असताना असे जाणवते की, संत साहित्यामध्ये विद्रोहाचा उद्गार जर कोणी व्यक्त केला असेल तर तो संत तुकारामांनी. जात्याभिमानाने उन्नत झालेल्या माणसांना त्यांनी वास्तवाची जाणीव करून दिली. जन्माला आलेला प्रत्येक माणूस हा निसर्गतः समान आहे त्यामुळे कोणालाही कोणाच्या जाती धर्माच्या माध्यमातून हिनवणे योग्य नाही याची आवर्जून दखल तुकाराम आपल्या अभंगांमध्ये घेताना दिसतात. संत तुकाराम महाराज हे संसारी असूनही परमार्थकडे वळले. जगामध्ये शांती निर्माण व्हावी ही संत तुकारामांची भूमिका होती. ' रडते हे जन देखवे ना डोळा म्हणून कळवळा येत असे ' या न्यायाने जीवन जगणारा संत वेळेप्रसंगी ' भले तरी देऊ कासेची लांगोटी नाठाळाचे माथे हाणू काठी ' हा संत तुकारामांचा स्वभाव होता. याच स्वभावाने त्यांनी अनेक लोकांना कर्जामधून मुक्त केले. कर्जामध्ये अडकलेला माणूस हा आपलं नैसर्गिक जीवन जगू शकत नाही. त्याला वेळोवेळीआपल्यावर असलेल्या कर्जाची आठवण होत राहते व त्यातच गुंतून पडतो व जीवनाचा खरा आनंद गमावून बसतो. एका अर्थाने तुकोबांचे अभंग त्याच्या समस्येचे निरसन करतात, व त्याला आपला स्वाभाविक बाणा जपायला मदत करतात.

आधुनिक कालखंडातील विज्ञानवादी संत म्हणून गाडगेबाबा यांचे नाव सर्वश्रुत आहे. गाडगे बाबा ज्या समाजामध्ये जन्माला आले त्या समाजामध्ये कमालीचे अंधश्रद्ध जीवन होते. वेगवेगळया चुकीच्या परंपरा या परीट समाजामध्ये होत्या. पोटासाठी श्रम करणे आणि जगणे हा एक मात्र नियम समाजातील लोकांच्या समोर होता. आणि त्या न्यायाने समाजातील प्रत्येक माणूस आपले जीवन जगत होता. शिक्षणाचा कमालीचा अभाव या समाजात होता. अशा समाजात जन्माला येऊन गाडगेबाबा यांनी समाजातील वाईट गोष्टींचा बिमोड करण्याच्या दृष्टिकोनातून नव्या प्रवासाला सुरुवात केली. ज्या समाजात आपण जन्मतो जगतो त्या समाजाचे आपण काही देणे लागतो हा मूलमंत्र गाडगेबाबांनी प्रत्येकाच्या मनामध्ये बिंबविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी घरदार सोडून त्यांनी समाज प्रबोधनाला सुरुवात केली. जातीप्रथा, शिक्षणाचा अभाव, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता या संदर्भात गाडगेबाबांनी वेगवेगळया संदर्भांच्या माध्यमातून लोकांच्या डोक्यामध्ये निर्माण झालेली घाण आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून निपटून टाकण्याचा प्रयत्न केला. त्यांचे कीर्तनाळा लोकांचा मिळणारा प्रतिसाद हा उदंड होता. साध्या सोप्या भाषेमधून लोकांना प्रश्न करून त्यांच्याकडूनच त्याची उत्तरे घेण्याचा एक वेगळा प्रयोग कीर्तनाच्या माध्यमातून होत गेला. व गाडगेबाबा घराघरापर्यंत पोचले. व्यसनाधीनता माणसाला संपवून टाकते त्याहीपेक्षा न शिकलेली माणसं ही हमाला सारखी काम करीत राहतात म्हणून आपल्या लेकरांना शिक्षण द्या. कमी किमतीचे कपडे घ्या,ताटवाठी मोडा पण आपल्या लेकरांना शिक्षण दिले वाचून सोडू नका हा मोलाचा संदेश गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून लोकांना दिला. विद्या मोठे धन आहे हे सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाचा विचार समाजासमोर

मांडला. या देशाची घटना लिहिली त्यांची ही फार मोठी कामगिरी आहे.हे सातत्याने ते लोकांना सांगत असत. उद्देश एकच की गोरगरिबांनी शिक्षण घेतले पाहिजे. मोठे झाले पाहिजे. व समाजाच्या प्रगतीसाठी झटले पाहिजे. नव्या पिढीच्या माध्यमातून एक नवी परंपरा निर्माण करण्याचा प्रयत्न गाडगेबाबांनी आपल्या हयात भर केला. माझ्या समोर एक नवा आदर्श निर्माण केला.

जागतिकीकरणाच्या वातावरणामध्ये स्वतःच्या बुद्धीच्या, प्रतिभेच्या जोरावर उड्या मारणाऱ्या माणसाला माणूस ओळखता येत नाही, ही खंत सातत्याने संत साहित्याचा अभ्यास करीत असताना वाटत राहते. सामाजिक जीवनामध्ये माणसाने मोठ्या प्रमाणामध्ये प्रगती केली, याबद्दल दुमत असल्याचे कुठलेही एक कारण नाही. पण मन शांती तो तेवढ्याच गतीने हरवून बसला आहे हे वास्तव नाकारता येत नाही. त्यामुळे त्याला आजच्या पर्यावरणामध्ये निकोप जीवन जगण्यासाठी संतांच्या विचारांची आवश्यकता भासत आहे. त्यामुळेच बाराव्या शतकापासून ते आज पर्यंत सलग संतांचे अभंग, संतांच्या ओव्या, संतांची भारुड, संतांची कीर्तन वाचली जातात. ऐकली जातात. यातच संतांच्या विचारांचे,संस्कारांचे सामर्थ्य दडलेले आहे असे म्हणावे लागते.

**निष्कर्ष :**

१. मानवता हा महत्त्वाचा उद्गार संतांच्या अभंगांमधून व्यक्त होतो.

२. समाजात निर्माण झालेली जातीयता हा चिंतनाचा विषय संतांचा होता.

३. समाजातील सर्व सामान्य माणसाचे शोषण होऊ नये ही भावना व्यक्त होते.

४. समाजातील व्यंगावर परखडपणे भाष्य करताना तुकोबांचे अभंग पाहायला मिळतात.

५. समाज परिवर्तन आणि सामाजिक बांधिलकी हा महत्त्वाचा संदेश संतांच्या साहित्यामधून व्यक्त होतो.

**संदर्भ :**

1. विद्रोही तुकाराम : डॉ. आ. ह. साळुंखे
2. संत साहित्य संदर्भ कोश : डॉ. मु. श्री. कानडे
3. संत साहित्य आणि समाज प्रबोधन : वि. श. चौगुले
4. आधुनिक संत आणि समाज : रवींद्र गोळे
5. संत साहित्यातील सामाजिकता : डॉ. तानाजी राऊ पाटील